POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

● वर्ष -०५ ● अंक-४८ ● मुंबई, शनिवार,२० सप्टेंबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

## मोबाईल शोध विशेष पथकाची सफल कामगिरी

## इंजि. मुलाच्या पहिल्या पगारातून घेतलेला मोबाईल मिळाला परत; ६०३ मोबाईल्स मालकांकडे सुपूर्द

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

इंजिनिअर मुलाने नोकरीच्या पहिल्या पगारातून मोठ्या हौशेने आईसाठी महागडा मोबाईल घेतला पण तो आनंद मायलेकांसाठी काही दिवसांपुरताच ठरला. मोबाईल गहाळ झाल्याने आईने पोलीस ठाण्यात मोबाईल गहाळ झाल्याची तक्रार दिली. मोबाईल परत मिळण्याच्या आशा आईला होती. नाशिक शहर पोलिसांच्या मोबाईल शोध विशेष पथकानेही विश्वास सार्थ ठरवत मोबाईल शोधून काढत त्या महिलेला परत केला. मुलाच्या पहिल्या पगारातून घेतलेला मोबाईल परत मिळाल्याने आईला आनंदाश्रू अनावर झाले. तिने नाशिक शहर पोलिसांचे मनोमन आभार मानले. निमित्त होते, हरविलेले मोबाईल सुपूर्द कार्यक्रमाचे. मोबाईल शोध विशेष पथकाची कामगिरी दीड हजारांपासून दीड लाखांपर्यंत सापडले मोबाईल लग्नात हरवला मोबाईल, हद्द ग्रामीण पोलीस दलाची असतानाही पोलिसांनी शोधला मोबाईल परत मोबाईल मिळाल्याने महिलेने मानले पोलिसांची आभार नाशिक पोलीस आयुक्तालयात गुरुवारी (दि.१८) दुपारी दोन वाजता हरविलेले मोबाईल सुपूर्द कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या हस्ते हरवलेले ६०३ मोबाईल मूळमालकांना परत करण्यात आले. या मोबाईलची १ कोटी १३ लाख रुपए किंमत आहे. या




कार्यक्रमात १३ पोलीस ठाणे हद्दीतील गहाळ झालेले मोबाईलचे मूळमालक उपस्थित होते. यावेळी वरिष्ठ पोलिसांनी नागरिकांना मोबाईलबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी नागरिकांनी मनोगत व्यक्त करून पोलिसांचे आभार मानले. डॉ. सुधीर पाटील यांनी सूत्रसंचालन केले. पोलीस स्टेशनची पहिल्यांदाच पायरी चढली अन परप्रांतीय व्यक्तीस परत मिळाला मोबाईल

परप्रांतीय अय्यर हे कामानिमित्त नाशिकमध्ये आले होते. मात्र, धावपळीत मोबाईल गहाळ झाला. याप्रकरणी त्यांनी पोलीस ठाण्यात मोबाईल गहाळ झाल्याची तक्रार दिली. पोलिसांनी त्यांचा मोबाईल शोधून काढत त्यांना कार्यक्रमात सुपूर्द केला. यावेळी त्यांनी मनोगत व्यक्त करत पोलिसांचे आभार मानले. शिवाय, पोलीस ठाण्याची पहिल्यांदाच पायरी चढलो आणि गहाळ झालेला मोबाईल परत मिळाला, हा क्षण अविस्मरणीय असल्याचे त्यांनी इंग्रजी भाषेतून मनोगत व्यक्त करत अनुभवकथन केले.

### असे शोधले मोबाईल

पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी नागरिकांचे हरवलेल्या मोबाईलचा शोध घेण्यासाठी मोबाईल शोध विशेष पथक तयार केले आहे. या पथकाने पोलीस ठाणेकडील गहाळ मोबाईलबाबत माहिती घेतली. पथकाने गहाळ झालेल्या मोबाईलचा तांत्रीक विश्लेषण विभागाकडून मिळालेल्या डाटाच्या आधारे मानवी कौशल्य व तांत्रिक पध्दतीचा अवलंब करून नाशिक शहरातील सर्व पोलीस ठाण्यामधील तब्बल ६०३ मोबाईल शोधून काढले.

## दीड महिन्यात दोन बळी, ॲम्ब्युलन्सची 5 तास कोंडी; मुंबई-अहमदाबाद मार्ग की मृत्यूमार्ग ?

■मुंबई । प्रतिनिधी,

प्रवासासाठी जलद असलेला मुंबई-अहमदाबाद महामार्ग हा प्रवासाचा मार्ग आहे की मृत्यूचा मार्ग असा प्रश्न आता निर्माण झालेला आहे. कारण या महामार्गावर होणाऱ्या वाहतूक कोंडीमध्ये गेल्या दीड महिन्यात दोन निष्पाप जीवांचा बळी गेला आहे. 30 जुलैला या महामार्गावरील वाहतूक कोंडीत ॲम्ब्युलन्स फसल्याने एका 49 वर्षीय महिला रुग्णाचा मृत्यू झाला होता. या घटनेला उलटून दीड महिना होत नाही, तोच आता पुन्हा या वाहतूक कोंडीमुळे एका चिमुकल्याला आपला जीव गमवावा लागला असल्याची हृदयद्रावक बातमी समोर आली आहे. वाहतूक कोंडीमध्ये ॲम्ब्युलन्स फसल्याने त्यामधील चिमुकल्याला वेळेवर उपचार मिळू शकले नाही आणि ज्यामुळे त्याला आपला जीव गमवावा लागल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वसईतील पेल्हार येथे 16 महिन्यांचा रियान शेख हा तो राहात असलेल्या इमारतीच्या चौथ्या मजल्यावरून खाली पडला. या घटनेत त्याच्या पोटाला गंभीर दुखापत झाली. ज्यानंतर तातडीने त्याला जवळच्या गॅलेक्सी रुग्णालयात दाखल करण्यात आले. यावेळी डॉक्टरांनी त्याच्यावर प्राथमिक उपचार करून त्याला मोठ्या रुग्णालयात हलवण्याचा सल्ला दिला. त्यानुसार, गुरुवारी दुपारी सुमारे 2.30 वाजता रुग्णवाहिकेद्वारे त्याला उपचारासाठी मुंबईकडे रवाना करण्यात आले. मात्र, त्याचदिवशी मुंबईझ्अहमदाबाद महामार्गावर



सकाळपासूनच वाहतुकीची प्रचंड कोंडी निर्माण झाली होती. या वाहतूक कोंडीत रुग्णवाहिका तब्बल पाच तास अडकून राहिली आणि रुग्णालयात पोहोचण्याआधीच रियानची प्रकृती ढासळू लागली. वाहतूक कोंडीत अडकलेली रुग्णवाहिका पुढे जाऊ शकत नसल्याने, अखेर रियानच्या कुटुंबीयांनी त्याला जवळच्याच ससूनवघर गावातील एका लहान रुग्णालयात नेले. मात्र, तेथील डॉक्टरांनी त्याला तपासून मृत घोषित केले. नजरेसमोरच चिमुकल्या रियानचा जीव गेल्याने त्याच्या घरच्यांनी हंबरडा फोडला. वाहतूक कोंडीमुळे आपल्या चिमुकल्याचा जीव गेल्याचा आरोपही यावेळी कुटुंबीयांकडून करण्यात आला. ज्यानंतर नागरिकांनी वाहतूक कोंडीबाबत संताप व्यक्त केला असून प्रशासनाविरोधात संतापाची लाट उसळली आहे. पण या वाहतूक कोंडीमुळे एखाद्याचा जीव गेल्याची ही काही पहिलीच घटना नाही. याआधी 30 जुलैला याच महामार्गावरील वाहतूक कोंडीत ॲम्बुलन्स अडकल्याने 49 वर्षीय महिला रुग्णाचा मृत्यू झाला होता. छाया कौशिक पुरव असे मृत्यू झालेल्या महिलेचे नाव होते. 30 जुलै रोजी सफाळे पश्चिमेकडील मधुकर नगर येथील छाया कौशिक पुरव यांचा दूदैवी मृत्यू झाला होता. ठाणे घोडबंदर महामार्गावरील खड्ड्यांमुळे झालेल्या वाहतूक कोंडीत एम्ब्युलन्स अडकल्यामुळे पालघर तालुक्यातील सफाळे, मधुकर नगर येथे राहणाऱ्या छाया पुरव यांना जीव गमवावा लागला होता. छाया यांच्या अंगावर झाड कोसळल्यामुळे त्या गंभीर जखमी झाल्या होत्या. त्यांना सुरुवातीला पालघर येथे उपचारासाठी नेण्यात आले मात्र प्रकृती खालावत असल्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांना मुंबईतील हिंदुजा रुग्णालयात नेण्याचा निर्णय घेतला. पण हिंदुजा रुग्णालयात नेत असताना मुंबई अहमदाबाद मार्गावर झालेल्या वाहतूक कोंडीमुळे छाया यांची ॲम्बुलन्स या वाहतूक कोंडीत अडकली. यावेळी भूल देण्याचे उपकरण निकामी होऊ लागल्याने छाया पुरव यांना असह्य वेदना होऊ लागल्या. रुग्णवाहिकेत त्यांचे पती कौशिक पुरव त्यांच्यासोबत होते. त्यांनी तातडीने वैद्यकीय मदत मिळावी म्हणून आग्रह धरला. परिस्थिती गंभीर होत असल्याने, रुग्णवाहिका मीरा रोडवरील ऑर्बिट हॉस्पिटलकडे वळवण्यात आली, जे हिंदुजा हॉस्पिटलपासून सुमारे 30 किलोमीटर अंतरावर होते. मात्र, तिथे पोहोचण्यापूर्वीच छाया पुरव यांची प्रकृती अधिकच खालावली आणि उपचार सुरू होण्याआधीच त्यांना मृत घोषित करण्यात आले.

## सोन्याची चेन चोरी करणाऱ्या इसमाचा खून करणाऱ्या गुन्हेगाराला पोलिसांनी केली अटक

■मिरारोड। प्रतिनिधी,


सोन्याचे चेन लुबाडण्याकरीता ईसमाचा खून करून पुरावा नष्ट केलेला गुन्हा उघडकीस आणून आरोपीस अटक . अधिक माहितीनुसार श्री. समीर विठ्ठल तांबे, रा. गौरव गॅलेक्सी फेज-०१, मिरारोड पूर्व यांनी त्यांचे वडील श्री. विठ्ठल बाबुराव तांबे, वय-७५ वर्षे हे दिनांक १६.०९.२०२५ रोजी मिसिंग झाल्या बाबत काशिमीरा पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारी वरून मिसिंग केस दाखल करून चौकशी पोहवा / दिनेश भोर यांचेकडे तपास देण्यात आला होता. नमुद मिसिंग व्यक्तीची आजू-बाजुचे पोलीस ठाण्यांना माहीती कळवून, सवोतोपरी हरवलेल्या व्यक्तीचे फोटो व वर्णनासह माहीती शेअर करुन बिट अधिकारी/ अंमलदार, बिट मार्शल, पेट्रोलिंग स्टाफ, गुन्हे प्रकटीकरण स्टाफ यांना हरवलेल्या व्यक्तीचा शोध घेणेबाबत सुचना देण्यात आल्या होत्या.

नमुद व्यक्तीचा शोध घेत असताना खबर देणार यांच्या घरापासून आजुबाजुच्या परिसरामधील अनेक सी.सी. टी.व्ही. कॅमेराचे फुटेज तपासले असता दि. १६/०९/२०२५ रोजी १४:०६ वा. च्या सुमारास सरस्वती बिल्डींग, एम.आय.डी.सी. रोड मिरारोड इमारतीमधील सागर सलून शॉप नं.८ या दुकानमध्ये हरवलेली व्यक्ती विठ्ठल बाबुराच तांबे हे प्रवेश करतांना दिसून आले. त्यानंतर दि.१७. ०९.२०२५ रोजी रात्रौ ०२.५९ वा. एक इसम दुस-या एका इसमास सागर सलून, शॉप नं.८, सरस्वती बिल्डींग, एमआयडीसी रोड, मिरारोड शॉपमधून बाहेर दोन्ही हाताने ओढत, फरफटत फुटपाथवरुन नेतानां दिसून आले. सीसीटिव्ही फुटेजच्या आधारे दि. १८.०९.२०२५ रोजी दुपारी ४.०० वा. चे सुमारास सलून चालकावर संशय बळावल्याने त्याच्या कडे पोलिसांनी विचारपुस केली असता उडवाउडवीची उत्तरे देवू लागल्याने त्यास ताब्यात घेवून अधिक चौकशी केली असता त्याने सांगितले, ₹ एक वृध्द व्यक्ती सलूनमध्ये टॉयलेट कुठे आहे? असे विचारत शॉपमध्ये आला व बराच वेळ तेथे बसुन होता, त्याचे गळ्यात असलेली सोन्याची चैन पाहून त्यास दुकानात बसण्यास सांगितले, थोड्या वेळानंतर दुकानामध्ये कोणीही ग्राहक नसल्याने, त्या इसमाचा टॉवेलने तोंड व नाक दाबून हाताने गळा आवळून जिवे ठार मारले व त्याचे गळ्यातील सोन्याची चेन काढून घेवून त्यास जिवे ठार मारून त्याचे प्रेत दुकानात्तच ठेवले.

रात्रीच्या वेळी रस्त्यावर कोणीही येत-जात नसल्याची खात्री करुन प्रेत सलून जवळील गाळा नंबर-०१/०२, बारक्या लॉकचाला या दुकानसमोरील गटाराचे झाकण उघडून त्यामध्ये प्रेत टाकून पुरावा नाहीसा केला₹ असे त्याने सांगितले. मृतदेह गटारातून ताब्यात घेतण्यात आला आहे. सदर ईसम हरवलेल्या चौकशीमध्ये सलून चालक अशफाक इशाक शेख याने हरवलेली व्यक्ती श्री विठ्ठल बाबुराव तांबे यांची सोन्याची चेन काढून घेवून खून केल्याचे निष्पन्न झाल्याने पोहवा/दिनेश भोर यांचे खबरीवरून दि. १९.०९. २०२५ रोजी काशिमीरा पोलीस ठाणे गुन्हा नोंद करून आरोपी अशफाक इशाक शेख, वय-३९ वर्षे, व्यवसाय सलून चालक, रा. सागर सलून, शॉप नं.८, सरस्वती बिल्डींग, एमआयडीसी रोड, मिरारोड मुळ रा.- उत्तरप्रदेश यास पुराव्याअंती अटक केली आहे. गुन्हयाचा तपास मा. वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली श्रीमती शितल मुंढे, पोलीस निरीक्षक (प्रशासन) हया करीत आहेत.

नमुद खूनाचा गुन्हा उघड करण्याचे अनुषंगाने मा. श्री. निकेत कौशिक, पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार, मा. श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, मिरा-भाईदर, वसई-विरार, मा. श्री. राहुल चव्हाण, पोलीस उपायुक्त, परि-०१, मिरारोड, मा. श्री. गणपत पिंगळे, सहाय्यक पोलीस आयुक्त, मिरारोड, आणि मा. राजेंद्र कांबळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, काशिमीरा पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

## मुंबई हायकोर्टाला पुन्हा बॉम्बची धमकी! पोलिस अलर्ट मोडवर




■मुंबई । प्रतिनिधी,

मुंबईत पुन्हा एकदा दहशतीचं सावट पसरलं आहे. उच्च न्यायालयाला बॉम्बस्फोटाची धमकी आल्याची माहिती समोर आली आहे. आज सकाळी एका अज्ञात व्यक्तीने थेट ११२ या हेल्पलाइनवर फोन करून, न्यायालय परिसरात स्फोट होऊ शकतो, असा इशारा दिला. या कॉलनंतर पोलिस विभागात प्रचंड खळबळ उडाली. तात्काळ बॉम्ब शोध पथक, श्वानपथक आणि स्थानिक पोलीस घटनास्थळी दाखल झाले.

न्यायालय परिसरात सुरक्षाव्यवस्था अधिक कडक करण्यात आली आहे. दरम्यान, या धमकीचा कॉल खरा की खोटा, याचा तपास पोलीस यंत्रणेकडून सुरू आहे. अशा प्रकारच्या धमक्या मिळाल्याने नागरिक आणि न्यायालयीन कर्मचारी यांच्यात भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. बॉम्बस्फोटाची धमकी आल्यानंतर मुंबई पोलिसांनी तात्काळ अलर्ट जारी केला आहे. सुरक्षेच्या दृष्टीने संपूर्ण शहरात खबरदारीचे काटेकोर उपाय केले गेले आहेत. न्यायालय परिसरात सुरक्षा वाढवण्यात आली असून, शहरातील महत्त्वाच्या चौकांवर, रेल्वे स्थानकांवर आणि गर्दीच्या भागांमध्ये गस्त घालणाऱ्या पथकांची संख्या वाढवण्यात आली आहे. त्याचबरोबर, किनारपट्टी भाग आणि प्रमुख सागरी मार्गांवर कडक तपासणी सुरू झाली आहे. नौदल आणि कोस्ट गार्ड यांच्याशीही सतत संपर्क ठेवला जात आहे. मुंबई पोलिसांनी नागरिकांना शांत राहण्याचं आवाहन केलं असून, कोणतीही संशयास्पद हालचाल दिसल्यास तात्काळ कळवण्याची विनंती केली आहे.

संभाव्य गोंधळ टाळण्यासाठी पोलीस पूर्ण सज्ज असल्याचं अधिकृतपणे सांगण्यात आलं आहे. मुंबई पोलिसांच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे की, न्यायालयाला मिळालेल्या धमकीच्या ११२ कॉलचा स्त्रोत शोधण्याचे काम तातडीनं सुरू करण्यात आले आहे. तांत्रिक पथके आणि सायबर गुन्हे शाखेची टीम या प्रकरणावर काम करत आहे. पोलिस आता कॉल रेकॉर्ड्स, नंबरच्या लोकेशन डेटा, व्हॉईस कॉलच्या सिग्नेचर आणि अन्य डिजिटल सुगाव यांचा सखोल तपास करीत आहेत. तसेच, कॉलच्या काही संभाव्य माध्यमांचा व्हॉईओव्हर-आयपी, इंटरनेट-आधारित ॲप किंवा स्थानिक सिम तपास करून खरा कॉलर कोण असा शोध लावण्याचा प्रयत्न सुरू आहे. पोलिसांनी सांगितले की, तांत्रिक विश्लेषणातून मिळालेल्या पुराव्यांवरूनच पुढे तपासाची दिशा निश्चित केली जाईल, त्यामुळे कोणतीही निष्कर्ष तोडगा न न काढता सावधगिरीने तपास केला जात आहे. मुंबई पोलिसांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे विशेष आवाहन केले आहे. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, कोणतीही संशयास्पद व्यक्ती, वस्तू किंवा पॅकेज दिसल्यास त्वरित पोलिसांना कळवावे. अफवांकडे दुर्लक्ष करणे आणि सोशल मीडियावर अप्रमाणित माहिती पसरवणे टाळावे, असेही आवाहन करण्यात आले आहे. पोलिसांच्या मते, अद्याप प्रत्यक्षात कोणताही स्फोट झालेला नसला तरी शहरातील संवेदनशील भागांमध्ये तपासणी वाढवण्यात आली आहे.

महत्त्वाच्या ठिकाणी पोलिस पथके तैनात असून प्रत्येक हालचालीवर बारीक नजर ठेवली जात आहे. कोणत्याही संभाव्य आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. मुंबईत बॉम्बस्फोटाच्या धमकीनंतर पोलिसांनी सुरक्षा यंत्रणा अधिक कडक केली आहे. सतत गस्त वाढवून आणि चौकस पाळत ठेवून पोलिसांनी शहराला सजग ठेवण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी किनारी भागांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचे कामही वेगाने सुरू करण्यात आले आहे. या कॅमेऱ्यांमुळे संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवणे सोपे होणार आहे. सुरक्षा उपाय वेळोवेळी अपडेट केले जात असून पोलिस दल पूर्ण दक्षतेने काम करत आहे.

## सरकारचा निर्णय ठरला वादग्रस्त, राज्यातील 1.8 लाख डॉक्टरांचा संप

■मुंबई । प्रतिनिधी,

राज्य सरकारने होमिओपॅथी डॉक्टरांना महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेत (टटउ) नोंदणी करण्याची परवानगी दिल्याने महाराष्ट्रातील 1.8 लाख डॉक्टर 24 तासांच्या संपावर गेले होते. ज्या होमिओपॅथी डॉक्टरांनी मॉडर्न फामाकोलॉजीचा एक वषार्चा सर्टिफिकेट कोर्स पूर्ण केला आहे, त्यांना एलोपॅथी औषधे देण्याची परवानगी देण्यात आल्याच्या निषेधार्थ हे आंदोलन करण्यात आले. इंडियन मेडिकल असोसिएशन महाराष्ट्रचे अध्यक्ष डॉ. संतोष कदम यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील सुमारे 1.8



लाख एलोपॅथी डॉक्टर्स ज्यात खासगी रुग्णालयातील डॉक्टरांचाही समावेश होता. ते सर्व या संपात सहभागी झाले होते. डॉक्टरांच्या संघटनांनी म्हटले आहे की, होमिओपॅथी डॉक्टरांच्या नोंदणीला परवानगी देण्याचा हा निर्णय रुग्णांच्या सुरक्षेसाठी आणि आरोग्य सेवांच्या गुणवत्तेसाठी गंभीर धोका आहे. या वर्षीच्या सुरुवातीला राज्य सरकारने महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेला निर्देश दिले होते की, ज्या होमिओपॅथी डॉक्टरांनी मॉडर्न फामाकोलॉजीचा सर्टिफिकेट कोर्स पूर्ण केला आहे, त्यांना विशिष्ट परिस्थितीत एलोपॅथी औषधे देण्याची परवानगी द्यावी. सरकारने हा निर्णय घेतल्यानंतर इंडियन मेडिकल असोसिएशन महाराष्ट्रच्या सदस्यांनी 11 जुलै रोजीच संपावर जाण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत झालेल्या बैठकीनंतर त्यांनी हा निर्णय मागे घेतला. त्यावेळी सरकारने अधिसूचनाही मागे घेतली होती. मात्र, 5 सप्टेंबर रोजी सरकारने पुन्हा एकदा एक नवीन जीआर जारी करून ही नोंदणी प्रक्रिया सुरू केली, ज्यामुळे एलोपॅथी डॉक्टर्स संतापले आणि त्यांनी 24 तासांचा संप पुकारला. अत्यावश्यक सेवा सुरू होत्या या आंदोलनात सरकारी आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयांमधील सर्व निवासी डॉक्टरांच्या संघटना, फेडरेशन ऑफ ऑल इंडिया मेडिकल असोसिएशन, असोसिएशन ऑफ स्टेट मेडिकल इंटर्न्स आणि गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज असोसिएशन यांसारख्या संघटना सहभागी झाल्या होत्या. दरम्यान, सर्व तातडीच्या आणि गंभीर सेवा सुरू ठेवण्यात आल्या होत्या.

## बेकायदा औषधसाठ्यावर छापा




■कल्याण। प्रतिनिधी,

अन्न व औषध प्रशासन विभागाने टिटवाळ्यातील डॉ. चेतन पाटील यांच्या श्री कृष्णा मल्टि स्पेशलिटी रुग्णालयावर मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत रुग्णालयात असलेले परवानाधारक मेडिकल स्टोअर स्थलांतरित झाल्यानंतरही हे रुग्णालय बेकायदेशीरपणे औषधांचा साठा करत असल्याची माहिती एफडीएला मिळाली आणि त्या आधारे ही कारवाई करण्यात आली. या छाप्यात अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने रुग्णालयाच्या जागेतून सुमारे ५.१६ लाख रुपये किंमतीची औषधे जप्त केली. ही औषधे कोणत्याही वैध परवान्याशिवाय साठवली जात होती, ज्यामुळे औषधे आणि सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० अंतर्गत हा गुन्हा ठरतो. यामुळे ही कारवाई करण्यात आली. औषध निरीक्षक राजश्री शिंदे आणि डोईफोडे यांनी ही कारवाई केली. या संपूर्ण कारवाईवर परिमंडळ ४ चे सहायक आयुक्त राजेश चौधरी तसेच सह आयुक्त कोकण विभाग व्ही. टी. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली ही यशस्वी कारवाई पार पडली.

## अवजड वाहनांना ठाणे जिल्ह्यात प्रवेश बंदी



■भिवंडी। प्रतिनिधी,

ठाणे पोलीस आयुक्तालय क्षेत्राच्या हद्दीत जड अवजड वाहनांमुळे वर्दळीच्या वेळेमध्ये तसेच शहरातील गदीर्मुळे अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे सर्व ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या क्षेत्राच्या हद्दीतील मार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये आणि परिसरातील वाहतूक सुरळीत तसेच सुनिश्चित राहणे सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी ठाणे जिल्ह्यात महामार्गावरून येर्णाया अवजड वाहनांना प्रवेश बंदी असल्याची अधिसूचना वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त पंकज शिरसाट यांनी मंगळवारी सायंकाळी प्रसिद्ध केले आहे. ही प्रवेश बंदी प्रयोगिक तत्वावर लागू करण्यात येत असून या अधिसूचनेनुसार १८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान सकाळी ६ ते रात्री १२ या दरम्यान अवजड वाहनांना प्रवेश बंदी असणार आहे. या बाबत काही हरकती व सूचना असल्यास वाहतूक विभागाच्या ठाणे तीन हात नाका येथील वाहतूक विभागाच्या पोलीस उपायुक्त कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन पंकज शिरसाट यांनी केले आहे.



## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# प्रश्नांचा फास



थोडसं अनुकूल वातावरण मिळालं, की जुनी दुखणी लगेच उसळी मारतात. महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचंही तसंच झालं आहे. गेल्या २५-३० वर्षांपासून छळणाऱ्या या दुखण्याकडे सुरुवातीपासूनच तात्कालिक दुखणं म्हणून पाहिलं गेलं. झटपट बरं करणारे उपाय त्यासाठी केले गेले. केंद्र आणि राज्य सरकारने आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांसाठी मदतीची पॅकेज जाहीर केली. गेल्या २५ वर्षांत कमीअधिक परिणामकारक अशा वेगवेगळ्या कर्जमाफीही दिल्या गेल्या. पण, त्याने प्रश्न मिटला नाही. मिटणारही नाही. तात्पुरत्या मलमपट्ट्यांनी रुग्ण आणि डॉक्टर अशा दोघाचंही समाधान होईल कदाचित. पण, त्याने दुखणं बरं होणार नाही; रुग्ण आजारातून बाहेर येणार नाही. वेदना कमी व्हाव्यात यासाठी जसा बधिरीकरणाचा उपचार केला जातो आणि त्यातून रुग्णाला दुखणं बरं झाल्याचा भास होतो, तसं आजवरच्या उपाययोजनांचं झालं आहे. आत्महत्यांच्या संख्या त्यामुळेच अचानक वाढतात आणि वातावरणात अस्वस्थता पसरते. राज्याच्या नुकत्याच पार पडलेल्या पावसाळी अधिवेशनात सरकारकडून या संदर्भातली जी आकडेवारी मांडली गेली, त्यामुळे या दुखण्याकडे पुन्हा एकदा सगळ्यांचं लक्ष गेलं. या वर्षाच्या पहिल्या तीन महिन्यांत राज्यात ७६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचं विधिमंडळाच्या सभागृहात सांगितलं गेलं. म्हणजे, दर तीन तासामागे एका शेतकऱ्याची आत्महत्या होत होती!! यावर्षीच्या आत्महत्यांत सर्वाधिक आत्महत्या विदर्भातल्या असून त्यातही यवतमाळ, अमरावती, अकोला, बुलढाणा आणि वाशिम या जिल्ह्यांतील आत्महत्यांचं प्रमाण सर्वाधिक आहे. आत्महत्यांपैकी २५७, म्हणजे सुमारे ३३% आत्महत्या या पाच जिल्ह्यांतच झाल्या आहेत. मराठवाड्यात याच काळात १९२ आत्महत्या झाल्या असून त्यानंतरच्या तीन महिन्यांत, जून अखेरीपर्यंत आणखी ५५ आत्महत्या झाल्याची नोंद आहे. १९९५ नंतर शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याच्या अनेक योजना राबवल्या गेल्या. देशभर राबवली जात असलेली प्रधानमंत्री किसान सन्मान योजना, पीक विमा योजना, सवलतीच्या दरात खतं-बियाणं देऊनही या दुखण्याला उतार पडायला तयार नाही. उलट, ते अधिकाधिक गंभीर होत असून त्याचा रोष आता मोर्चे-आंदोलनांतून बाहेर पडू लागला आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे महाराष्ट्रातील प्रदेश आणि संख्या यात गेल्या अनेक वर्षांत फारसा फरक पडला नसला, तरी त्याची कारणं मात्र वेगवेगळी आहेत. अनेक वेळा तर ती परस्परविरोधी पाहायला मिळतात. त्यामुळे, या दुखण्याला एकच एक उपाय नाही. पण, सर्व आत्महत्यांची कारणं पाहून त्यावर उपाययोजना करण्यासाठी व्यापक आराखडा तयार केला आणि त्यातील उपायांची प्रदेशनिहाय प्राधान्याने अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला, तर कदाचित त्याचे सकारात्मक परिणाम मिळतीलही. सरकारने वेळोवेळी अनेक उपाययोजना लागू केल्या. त्याची यशस्वी अंमलबजावणी झाल्याचे अहवाल सरकारदप्तरी जमा आहेत. तरीही आत्महत्या थांबत नसतील, तर औषधातच काहीतरी गडबड आहे, त्याचा अपेक्षित परिणाम होत नाही हे सरकारने स्वीकारण्याची गरज आहे. अनेक स्वयंसेवी संस्थांनी आपापल्या परीने या प्रश्नाला भिडायचा प्रयत्न केला आहे. शेतकऱ्याने; घरातल्या कर्त्या पुरुषाने आत्महत्या केल्यानंतर मागे राहिलेल्या त्याच्या पत्नीला, मुलाबाळांना धीर देऊन त्यांच्या पुनर्वसनासाठी ठोस उपाय करण्याचा प्रयत्न या संस्थांकडून सुरू आहे. त्याला यशही येत आहे. पण, स्वयंसेवी संस्थांचे हे प्रयत्न एकूण गरज पाहता तोकडे पडताहेत. दुर्घटना घडल्यानंतर उर्वरित कुटुंबीयांची काळजी घेण्याची गरज असतेच; पण त्याहीपेक्षा दुर्घटना घडणारच नाही यासाठी दीर्घकालीन धोरणात्मक उपाययोजनांची गरज आहे. अशी उपाययोजना केवळ सरकारच करू शकतं. केंद्र आणि राज्यातील सरकारांनी केवळ या एकाच प्रश्नासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी करून, त्यात तज्ज्ञांचा समावेश करून महत्त्वाकांक्षी कार्यक्रम आखायला हवा. शेतकऱ्याला दोरीच्या फासापर्यंत जावंच लागणार नाही, अशी परिस्थिती निर्माण व्हायला हवी.

खरंतर, हे सगळ्यांनाच मान्य आहे. याबाबत कोणाचंच दुमत नाही. पण, तरीही जे प्रयत्न व्हायला हवेत, ते होताना दिसत नाहीत. उलट, या आत्महत्यांबद्दल संशय निर्माण करणाऱ्या कथा चर्चिल्या जातात हे दुर्दैव आहे. दुष्काळ, अतिवृष्टी, शेतमालाला रास्त भाव न मिळणं, शेतमालाचा बहुतांश असंघटित बाजार - यानंतर आता वातावरणीय बदलाचाही समावेश या संकटांमध्ये होतो आहे. अन्य सामाजिक, सांस्कृतिक कारणं त्यानंतर आहेतच. यातल्या कोणत्या प्रश्नांना सरकारकडे उत्तर असेल आणि कोणते प्रश्न स्वयंसेवी संस्थांच्या हाती सोपवायचे याचा विचार करून दोन्ही पातळ्यांवर त्यासाठी काम करावं लागेल. महाराष्ट्रात आरक्षणासाठी जसं मराठ्यांचं आंदोलन सुरू आहे, तसंच अन्य राज्यात तिथले धारक; शेतकरी समाजही याच कारणासाठी रस्त्यावर आले आहेत. आपल्या दुःस्थितीला आरक्षण हे उत्तर नाही, हे त्यांनाही माहीत आहे. पण, जखमेवर फुंकर घालणं ही त्यांची गरज आहे. शेतीच्या प्रश्नाकडे प्राधान्याने, गांभीयार्ने पाहिल्याखेरीज, मक्तेदारी अर्थव्यवस्थेकडे चाललेली वाटचाल बदलल्याखेरीज फासाला लटकावून घेणाऱ्या बळीराजाला दिलासा मिळणार नाही. शेतीसंबंधी असा मूलभूत विचार केला नाही, तर आत्महत्यांची संख्या आणि त्यातून असंतोष वाढतच जाईल. त्यातला धोका सगळेच जाणतात.

# जगातील सर्वात मोठ्या कराराचे वेध



अमेरिकन शुल्कामुळे बेजार झालेल्या भारतीय अर्थव्यवस्थेला जगातील सर्वात मोठा करार खुणावतो आहे. गेल्या दोन वर्षांपासूनचे अथक परिश्रम फळाला येण्याची चिन्हे आहेत. हे ईप्सित साध्य झाले, तर मोठा अध्यायच लिहिला जाईल. रशियाकडून तेल खरेदी करीत असल्याची जबर शिक्षा म्हणून अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय मालावर थेट ५० टक्के आयात शुल्क लागू केले आहे. त्यामुळे भारत-अमेरिकेतला १२९ अब्ज डॉलरचा व्यवहार अडचणीत आला आहे. भारतीय अर्थव्यवस्थेला हा मोठा झटका आहे. कारण, भारतीय वस्तू अमेरिकेत निर्यात होण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे. या अडचणीच्या वरवंट्यात मात्र आशेचा किरण निर्माण झाला आहे. भारताने यापूर्वीच इंग्लंडसोबत मुक्त व्यापार करार केला आहे. आता जगातील सर्वात मोठा मुक्त व्यापार करार भारताच्या पुढ्यात येऊन ठेपला आहे. तो प्रत्यक्षात आला, तर जागतिक अर्थव्यवस्थेवर त्याचा मूलगामी परिणाम होणार आहे. शिवाय २०४७पर्यंत विकसित भारताकडे नेण्याच्या संकल्पात तो मैलाचा दगडही ठरणार आहे.

अमेरिकेने शुल्क लादल्यानंतर यासंदर्भात भारताकडून उघडपणे नाराजी, टीका-टिपण्णी किंवा सडेतोड उत्तर देण्यात आलेले नाही. यापुढेही ते दिले जाणार नाही. भारतीय परराष्ट्र धोरण हे आक्रमक आणि आक्रस्ताळे कधीच नव्हते. भविष्यातही ते नसेलच. शिवाय कुणा एका गट किंवा महाशक्तीच्या बाजूने उभे राहण्याचा प्रघात मोडून अलिप्ततेचा पुरस्कार भारताने केला आहे. पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या या धोरणाची अजूनही कसोशीने अंमलबजावणी केली जाते, कारण त्यात सर्वाधिक हित दडलेले आहे. यामुळे समांतर विकासाची कवाडे खुली होतात, शिवाय ठराविक शिक्का बसण्यापासूनही सुरक्षित राहता येते. स्वातंत्र्यानंतर आठव्या दशकातही या धोरणातली दूरदृष्टी प्रतित होते. अमेरिकन शुल्कवाढीला प्रत्युत्तर देण्यासाठी एका मोठ्या संधीने भारतासमोर दरवाजा ठोठावला आहे आणि ती आहे युरोपियन महासंघासोबतच्या मुक्त व्यापार कराराची.

एकूण २७ देशांचा समूह असलेला युरोपियन महासंघ हा अनेक श्रीमंत, अग्रेसर आणि तंत्रनिपुण समजला जातो. इतिहासात डोकावता यातील अनेक देशांनी जगावर राज्य करण्याचा मनसुबा प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला. तो फसला. दोन विश्वयुद्धांनी पोळलेल्या युरोपीय देशांनी शांतीची कास धरत नाटोसारख्या संघटनेत सहभागी होण्याचा निर्णय घेतला. सध्या रशियाचे आक्रमण पाहता युरोपीय देशांच्या पोटात गोळा आला आहे. पोलंडच्या वेशीवर काही विपरीत घटना घडल्या आहेत. त्यामुळे धास्तावलेले युरोपीय देश सुख आणि समृद्धीची आस धरून आहेत. गेल्या दोन वर्षांपासून भारतासोबत युरोपियन महासंघाची व्यापार कराराबाबत बोलणी सुरू आहे. भारताने इंग्लंडसोबत मुक्त व्यापार करार करून एक पाऊल पुढे टाकले आहे. आता महासंघासोबत मुक्त व्यापार करार झाला, तर उर्वरित २६ देशांची बाजारपेठ भारताला खुली होणार आहे. विशेष म्हणजे, युरोपियन महासंघाचा अद्याप कुठल्याही मोठ्या देशाशी मुक्त व्यापार करार झालेला नाही. त्यामुळे तब्बल २७ देशांचा प्रथमच कुणा सक्षम देशाशी मुक्त व्यापार करार होणार आहे. तो ऐतिहासिक तर ठरेलच शिवाय अनेकथार्ने तो महत्त्वपूर्णही.

जगातील चौथी वेगवान अर्थव्यवस्था बनलेल्या भारतासाठी युरोपीय बाजारपेठ अत्यंत उपयुक्त आहे. अमेरिकेत निर्यात होणाऱ्या अनेक वस्तू आणि पदार्थ हे युरोपच्या बाजारपेठात विक्री होऊ शकणार आहेत. २०२४ मधील आकडे पाहता भारताच्या एकूण नियार्तीत युरोपचा वाटा ११.५ टक्के आहे. भारत आणि युरोपियन महासंघाचा व्यापार तब्बल १२० अब्ज युरो एवढा आहे. मुक्त व्यापार करार झाला तर हा व्यापार नजीकच्या काळातच थेट दुप्पट होण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे भारतीय उत्पादनांना मागणी वाढेल. यातून भारतातील उत्पादन प्रक्रियेला चालना लाभेल. परिणामी, गुंतवणूक आणि रोजगार निर्मितीचा पाया रचला जाईल. युरोपातीलच अग्रेसर अर्थव्यवस्था असलेल्या जर्मनीला मागे टाकून भारत तिसऱ्या क्रमांकाची जागतिक अर्थव्यवस्था होईल. त्यामुळे भारतापुढे केवळ अमेरिका आणि चीन हे दोनच देश असतील. याद्वारे जागतिक व्यापार आणि अर्थकारणात भारताचा वरचष्मा प्रस्थापित होईल.

युरोपियन महासंघातील २७ देशांना भारतीय बाजारपेठ उपलब्ध झाल्याने तेथील अनेक गुणवत्तापूर्ण, दर्जेदार आणि तंत्रज्ञानाधारित उत्पादने भारतात उपलब्ध होतील. शिवाय गुंतवणूक, तंत्रज्ञान हस्तांतर, संयुक्तपणे उपकरणे किंवा मालाची निर्मिती अशा प्रकारच्या संयोगांनाही जन्म दिला जाईल. फ्रान्सकडील राफेल ही लढाऊ विमाने यापूर्वीच भारताने खरेदी केली आहेत. नजीकच्या काळात आणखी राफेल खरेदीचा विचार भारत करू शकतो. ड्रोन, आर्टिफिशिअल इंटेलिजन्स, सेमीकंडक्टर, माहिती-तंत्रज्ञान अशा बहुविध क्षेत्रात युरोपीय देश आणि भारताचे चांगले सूत जुळू शकते. भारतापासून मध्यपूर्वेतील देशांमार्गे युरोपात आर्थिक कॉरिडॉर साकारण्याचे यापूर्वीच प्रस्तावित आहे. त्यास युरोपियन देशांसह भारताची अनुकूलता आहे. जर भारत आणि महासंघात मुक्त व्यापार करार झाला तर हा कॉरिडॉरही झपाट्याने विकसित होऊ शकतो. विशेष म्हणजे, चीनच्या अत्यंत महत्त्वाकांक्षी बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्हला (बीआरओ) तो जबर धक्का असेल. प्राचीन काळी असलेल्या रेशीम मागार्चा आधार घेत चीनने युरोप आणि जगाची बाजारपेठ काबीज करण्यासाठीच बीआरओला जन्म दिला आहे. मात्र, मुक्त व्यापार कराराद्वारे चीनच्या या महत्त्वाकांक्षी उपक्रमाला छेद देण्याची किमयाही आपसूकच घडणार आहे.

भारत आणि युरोपीय महासंघातील अधिकाऱ्यांमध्ये चर्चेच्या फेऱ्या सध्या सुरू आहेत. या बैठकांना आता आणखी गती आली आहे. त्यामुळे या वर्षाच्या अखेरीस मुक्त व्यापार कराराला मूर्त रूप येण्याची दाट चिन्हे आहेत. कारण, दोन्ही बाजूकडून अतिशय सकारात्मक पावले पडत आहेत. त्यामुळे यंदाच्या नाताळातच किंवा नववषार्रंभी या कराराचे गिफ्ट मिळू शकते. यासंदर्भात भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने दूरगामी नियोजन केले आहे. महासंघाबरोबर करार झाल्यास जानेवारीच्या भारतीय प्रजासत्ताक दिन सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून महासंघाच्या अध्यक्ष उसुर्ला वॉन देर लेयन या असू शकतात. यातून महासंघाशी आणखी घट्ट नाते प्रस्थापित होऊ शकेल.

आक्रस्ताळ्या ट्रम्प यांच्याकडून वारंवार भारताचे नाव घेऊन टीका किंवा धमक्या दिल्या जात आहेत. त्याला चोख प्रत्युत्तर देण्यासाठी युरोपियन महासंघाचा व्यापार करार अतिशय प्रभावी ठरणार आहे. यातून अमेरिकेसारख्या बलशाली देशाला आणि त्याच्या नेतृत्वाला योग्य ती जागा दाखविण्याची किमयाही साधली जाणार आहे. ब्रिटनने भारतावर दीडशे वर्ष राज्य केले, तर अन्य युरोपीय देशांनीही भारताच्या अनेक प्रांतांवर कब्जा मिळवला होता आणि आता सात दशकानंतर याच देशांशी भारताचा मुक्त व्यापार करार नवा अध्याय लिहिणारा आहे. संरक्षण, तंत्रज्ञान, विज्ञान, अंतराळ, पर्यावरण, शिक्षण, सांस्कृतिक, पर्यटन, परराष्ट्र संबंध आदी क्षेत्रांवर मुक्त व्यापाराचा प्रभाव पडणार आहे. यंदा सारे काही जुळून आले आहे. अर्थात त्यावर अमेरिका, चीनसह अनेक देशांची नजर आहे. त्यामुळे हा करार कुठल्याही परिस्थितीत अंतिम व्हावा यासाठी भारत आणि महासंघ या दोघांनाही विशेष काळजी घ्यावी लागणार आहे. अन्यथा एखादी माशी शिंकली तर मोठ्या महत्प्रयासांवर पाणी पडणार आहे. त्यामुळे हातातोंडाशी आलेला घास हिरावून न जावा यासाठी मुत्सद्दीपणे वाटाघाटी आणि चौकस राहून अडथळे दूर करावे लागणार आहेत. दक्षिण आशियातील देश ते युरोपातील २७ देशांच्या बाजारपेठेचा हा मिलाफ जागतिक राजकारण, अर्थकारण, परराष्ट्र संबंध, भूराजकीय रणनीती आदींवर परिणाम करणार आहे. त्यामुळे त्याच्या गुड न्यूजची तूर्त वाट पाहूया.

# आरक्षण हवंय का?




आरक्षणाचा हेतू सर्व समाजघटकांना शिक्षण, नोकरी व राज्य कारभारात समान संधी देणे हा आहे. या तरतुदीमुळे दुर्बल घटक प्रगतिपथावर येऊ लागले, जातीभिंती कोसळल्या आणि सामाजिक समता दृढ झाली; मात्र आज राजकीय फायद्यासाठी आरक्षणावरून संघर्ष पेटवला जात आहे.

सर्व जाती समुदायाला शिक्षण, नोकरी व राज्य कारभारात योग्य संधी मिळाव्यात म्हणून घटनात्मकदृष्ट्या आरक्षणाची तरतूद आहे. या शिक्षण व शासनव्यवस्थेत प्रत्येक समुदायाला प्रतिनिधित्व मिळावे हा घटनाकारांचा प्रामाणिक उद्देश होता. ही तरतूदच केली नसती तर शिक्षण व शासनव्यवस्थेत फक्त प्रगत समुदायाचेच प्रभुत्व व प्रतिनिधित्व निर्माण झाले असते. समान संधी उपलब्ध झाल्यामुळे सर्व समाजबांधव हळूहळू प्रगतिपथावर येत आहेत. जे जातीसमुदाय कधी शिकलेच नव्हते, त्यांच्याही पहिल्या-दुसऱ्या पिढ्या शिकायला लागल्या आहेत. शिक्षण व शासनव्यवस्थेत प्रत्येक घटक आपापले योगदान देत आहे. यामुळे शिक्षणात, शासनात व सत्तेत समतोल कायम राखला जात आहे. प्रत्येक समाजघटक एकदुसऱ्याच्या खांद्याला खांदा लावून पुढे जात आहे. विचारांचे, संस्कारांचे, संस्कृतीचे, समाजमनाचे आदान-प्रदान करत आहे. यामुळे जातीच्या भिंती कोसळायला आणि धमार्चा पराकोटीचा अभिमान वितळायला मदत झाली. माणूस म्हणून माणसं एकदुसऱ्यांशी व्यवहार, आदान प्रदान करायला लागली.

कायद्याने आरक्षण देतानाही ५० टक्क्यांच्या आतच अठरापगड जाती, इतर मागासवर्गीय, एससी, एसटी यांना सामावून घेऊन राहिलेल्या ५० टक्क्यांमध्ये उच्च जाती, उच्च विद्याविभूषित लोकं, खुला प्रवर्ग यांना सामावून घेऊन त्यांच्या प्रगतीचा मार्ग मोकळा ठेवला आहे. म्हणूनच जो उच्च जातीत असेल, जो जास्त मेहनत करेल, त्यांना कायद्याने ५० टक्के वाटा खुला ठेवलेला आहे. वरच्या वगार्साठी ईडब्ल्यूएस कोटाही राखीव ठेवला आहे. ५०-५० टक्के वाटा दोन्ही आहे रे आणि नाही रे वगार्साठी कायम आहे. आरक्षणामुळे घोड्यांच्या स्पर्धेत गाढवं पुढे जात आहेत किंवा आम्हाला फक्त शिक्षणासाठी आरक्षण पाहिजे, बाकी आमची बरोबरी करायला सहा पिढ्या जातील असा युक्तिवाद केला जात आहे; मात्र आरक्षण नसते तर दुर्बल घटक कायम उच्च जातींच्या ओज्याखाली दबून राहिला असता, हेही वास्तव आहे. आपण संविधानाने दिलेल्या समान न्याय आणि समान अधिकार या तत्त्वाचा स्वीकार केला पाहिजे. जे वर्ग मागास आहेत, जे अजूनही शिक्षणाच्या आणि विकासाच्या मुख्य प्रवाहात आलेले नाहीत, त्यांना सोबत घेऊन चालणे हे आर्थिक, सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या विकसित वगार्चे व सर्वांचेच काम आहे. केवळ जातीपातीच्या चष्म्यातून त्याकडे पाहता दुर्बल घटक म्हणून पाहिले पाहिजे आणि विकासाची संधी त्यांना दिली पाहिजे.

आरक्षण नको किंवा आर्थिक निकषांवर आरक्षण द्या असे सांगणारा एक मोठा वर्ग अस्तित्वात आहे. वर्णव्यवस्थेचा वृथा अभिमान आणि जातींचा स्वाभिमान यातून हे प्रकट होत आहे. भारतीय राज्यघटनेत आर्थिकदृष्ट्या आरक्षणाची तरतूद नाही. सन २०१९च्या निवडणुकीत विद्यमान केंद्र सरकारने खुल्या प्रवगार्साठी व उच्च जातींसाठी आर्थिकदृष्ट्या मागास आरक्षणाची घोषणा केली होती. त्यानुसार सरकारने १०३व्या घटनादुरुस्तीद्वारे खुल्या प्रवगार्साठी १०टक्के आरक्षण दिले. सर्वोच्च न्यायालयाने तीन-दोन अशा बहुमताने नोव्हेंबर २०२२रोजी या आरक्षणाच्या वैधतेला मंजुरी दिली. संविधानाने दिलेले सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास असे जातनिहाय आरक्षण हटवून सर्वांनाच केवळ आर्थिकदृष्ट्या मागास हा निकष लावून आरक्षण द्यायचे झाल्यास आरक्षणाची टक्केवारी ४० ते ७० टक्क्यापर्यंत पोहोचू शकते.

सध्याच्या आर्थिक निकषानुसार, ज्यांचे वार्षिक उत्पन्न आठ लाखांपेक्षा कमी आणि जमीन पाच एकरपेक्षा कमी आहे, त्यांना आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्ग समजले जाते. त्यानुसार १० टक्के ईडब्ल्यूएस आरक्षणाची तरतूद केलेली आहे. हा निकष सर्वांनाच लावावा लागेल. इंद्रा सहानीविरुद्ध भारत सरकार आणि इतर खटल्यांमध्ये आरक्षणाची मयार्दा ५० टक्केच्या वर वाढवता येत नाही, असे स्पष्टपणे नमूद केलेले आहे. आरक्षणासंदर्भात खुल्या प्रवगार्तील आर्थिक दुर्बल आणि मागासवर्गीय आर्थिक दुर्बल यांची तुलना होऊ शकत नाही. एखादा ब्राह्मण समाजातील व्यक्ती आर्थिकदृष्ट्या दुर्बल असेल, तरी तो सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास ठरत नाही. स्वातंत्र्याच्या आधीपासून चालत आलेली वर्णव्यवस्था याला कारणीभूत आहे. मनुचे भूत आपण जोपर्यंत गाडत नाही तोपर्यंत सामाजिक समानता अशक्य आहे. जेव्हा जातीपातीच्या भिंती तुटून पडतील, सामाजिक, सांस्कृतिक, वैचारिकदृष्ट्या लोक एकत्र येतील तेव्हाच हे शक्य आहे.

सध्या आरक्षणावरून घमासान सुरू आहे. मराठा प्रवगार्ला कुणबीमधून आरक्षण पाहिजे, तर ओबीसी प्रवगार्ला मराठ्यांच्या ओबीसीकरणाला तीव्र विरोध आहे. राजकीय आरोप-प्रत्यारोप तीव्र होत आहेत. सरकारच्या हैद्राबाद गॅझेटर लागू करण्याच्या शासन निर्णयाविरोधात ओबीसीमधील काही घटकांनी न्यायालयात याचिका दाखल केल्या आहेत. दुसरीकडे लोकप्रिय योजनांमुळे सरकारी तिजोरीत खडखडात असतानाही नोकऱ्यांची उपलब्धता आणि रोजगारावर चर्चाच होताना दिसत नाही. काही शासनकर्त्यांना व राजकारण्यांना आरक्षण कायमचे संपवायचे असल्याने त्यांनी मराठा-ओबीसी, ओबीसी-आदिवासी, आदिवासी-धनगर, दलित- मराठा असा संघर्ष पेटवण्यात व तो धुमसत राहण्यात धन्यता मानली आहे, या शंकेला वाव आहे.

सर्व जातीधर्मांना समान प्रतिनिधित्वाची संधी असा आरक्षण या शब्दाचा साधा सरळ अर्थ होतो; मात्र व्यवस्थेला सर्व जातीव्यवस्थेसाठी समान संधी उपलब्ध करून न देता त्यांच्यात समान संघर्ष कसा उभा राहील व तो चालत राहील, यात अधिक रस असतो. यालाच राजकारण म्हणतात. आपण सर्वजण या पटावरील फक्त प्यादे असतो. सरकारने ब्राह्मण विरुद्ध मराठा असा राजकीय सत्तासंघर्ष मोठ्या शिताफीने फिरवून मराठा विरुद्ध ओबीसी अशा नव्या वादाला आरक्षणाची फोडणी दिली आहे, असेच सध्याचे राजकीय चित्र आहे. सत्ताधारीही सरकारच आणि विरोधकही सहकारीच ही नव्या राजकारणाची परिभाषा सरकारने मांडली आहे.

राज्यात- देशात जातधर्मावरून सुरू असलेले वाद तत्कालीन फायद्याचे असले, तरी दीर्घकाळ नुकसान करणारे आहेत. आजच्या घडीला प्रत्येक समाजघटक आरक्षणाचे लाभ घेत आहे. त्यामुळे आरक्षणाच्या नावाने बोटं मोडून चालणार नाही. उलट आरक्षणावरून पडलेली फूट बुजवावी लागेल. सरकारलाच त्यात पुढाकार घ्यावा लागेल. आरक्षण नको असेल तर सर्वांना समान संधी, मोफत शिक्षण, आरोग्य, नोकऱ्या व रोजगाऱ्याच्या संधी उपलब्ध करून द्याव्या लागतील. सर्वच पातळ्यांवर सामाजिक समता प्रस्थापित करावी लागेल.

# फिरायला जायचं आहे तर उत्तम पर्याय आहेत कोकणातील पर्यटन स्थळे



फिरायला जाण्यासाठी प्रत्येकासाठी वेगवेगळी ठिकाणं असतात. पण बऱ्याचदा प्लॅन केला जातो तो कोकणात फिरायला जायचा. कोकणातील पर्यटन स्थळे अनेक आहेत. कोकण सहल काढणं म्हणजे खरं तर एक मजा. कोकण पर्यटन स्थळे नक्की कोणती, तिथे कसं जायचं, कुठे फिरायचं असा प्रश्नही पडतो. कोकण दर्शन माहिती मराठी मध्ये आपल्याला नेहमीच जाणून घ्यायला आवडते. कोकण हा खरं तर महाराष्ट्रातील कॅलिफोर्निया असे नेहमीच म्हटले गेले आहे. इथले समुद्रकिनारे, शुद्ध हवा, परिसर, हिरवळ या सगळ्याने मन प्रसन्न होऊन जाते. इतकंच नाही तब्बेतही चांगली होते. इथली हवाच निराळी आहे. त्यामुळे रोजच्या धावपळीच्या आयुष्यातून सुटका हवी असेल तर कोकण सहल ही किमान एकदा तरी करायला हवी. तुमचं कोकणात घर असेल तर मग मजाच आहे. पण जर घर नसेल आणि तुम्हाला कोकणात फिरायला जायचं असेल तर तुम्ही या ठिकाणांना नक्की भेट द्यायला हवी जी आम्ही तुम्हाला या लेखातून सांगणार आहोत. कोकणात खरं तर अनेक ठिकाणं फिरण्यासारखी आहेत. काही प्रसिद्ध आहेत तर काही प्रसिद्ध नाहीत तरीही सुंदर आहेत जिथे किमान एकदा जाऊन तरी तुम्ही भेट द्यायला हवी. पाहूया कोणती आहेत ही ठिकाणं.

### कशेळी

रत्नागिरी जिल्ह्यातील कशेळी हे लहानंसं गाव आहे. अजूनही इथे मातीचे रस्ते आणि कोकणातील शुद्ध आणि स्वच्छ वातावरण जपलं गेलं आहे. गावची वस्ती तशी जास्त नाही. पण या गावात दोन मंदिर आहेत. त्यापैकी एक लक्ष्मीनारायण मंदिर आणि एक आहे ते कनकादित्य मंदिर. सूयार्ची केवळ सात मंदिरे संपूर्ण भारतामध्ये आहेत आणि त्यापैकी एक मंदिर आहे ते म्हणजे कनकादित्याचं मंदिर. हे मंदिर कसं निर्माण झालं याचीही एक गोष्ट नेहमी सांगितली जाते. एक गलबत कशेळी गावाच्या समुद्रकिनाऱ्यापाशी आले असता अडकले, पुढे जाईना भरपूर प्रयत्न केले पण जहाज काय जागचे हलले नाही. शेवटी त्या व्यापाऱ्याच्या मनात आले की, कदाचित देवाची येथेच राहण्याची इच्छा आहे. म्हणून त्याने एक मूर्ती किनाऱ्यावरील गुहेत आणून ठेवली. त्यानंतर त्याचे जहाज मार्गस्थ झाले. कशेळी गावात कनकाबाई नावाची एक सूर्योपासक गणिका राहत होती. तिच्या स्वप्नात याच वेळी ही सूर्य मूर्ती आली आणि भगवान सूर्यनारायणाने कनकेला म्हनाले की तू मला येथून ने आणि तुझ्या गावात मंदिर बांध त्यात माझी स्थापना कर. कनकाबाईने ही गोष्ट त्यावेळी ग्रामस्थांना सांगितली मग ग्रामस्थांच्या मदतीने ती सूर्य मूर्ती गावात आणून स्थापना केली. त्या कनकाबाई मुळे घडले त्यामुळे कनकेचा आदित्य म्हनून कनकादित्य असे या मंदिराला नाव पडले.

कसे पोचावे - रत्नागिरी पर्यंत ट्रेन आणि त्यानंतर रिक्षा अथवा एस. टी., राजापूरपासून धारतळे आणि मग आडिवरे अशी एस. टी.

वैशिष्ट्य - रथसप्तमी उत्सव पाच दिवस चालणारा हा उत्सव कशेळी आणि आजूबाजूच्या गावासाठी महत्त्वाचा काळ असतो. या उत्सवात कनकादित्य आणि कालिकादेवी यांचे होणारे लग्न हा सर्वांसाठीच आवर्जून बघण्याचा लग्नसोहळा असतो. कनकादित्या मंदिरामध्ये साधारण ८५० वर्षांपूर्वीचा ताम्रपटही आहे.

खर्च आणि राहण्याचे दिवस - साधारण ३००० रू. आणि २ दिवस (प्रति व्यक्ती)

### आडिवरे, महाकाली मंदिर

कशेळी गावापुढील गाव असणारे आडिवरे हे तेथील महाकाली मंदिरासाठी प्रसिद्ध आहे. इथे कायम भक्तांची रांग असते. पण कितीही गर्दी असली तरीही इथे अतिशय प्रसन्न वाटते आणि त्याशिवाय शांतताही असते. महाकाली, महासरस्वती आणि महालक्ष्मी अशा तीन देवी अनेकांच्या कुलदेवता आहेत. त्यापैकी महाकाली ही कुलदेवता या ठिकाणी आहे. इसवी सनाच्या ९व्या शतकात भंडारी ज्ञातीचे लोक वेत्ये या त्यांच्या समुद्राकाठच्या गावी नेहमीप्रमाणे मासे पकडण्यासाठी गेले असता त्यांचे जाळे अडकून पडले. बरेच प्रयत्न करूनही जाळे वर येईना तेंव्हा त्यांनी जलदेवतेची करुणा भाकली. त्यांच्यापैकी मूळ पुरुषाच्या स्वप्नात येऊन श्री महाकालीने दृष्टान्त दिला आणि मी महाकाली आहे, तू मला वर घे आणि माझी स्थापना कर असे सांगितले. त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी जाळे ओढले असता त्यांना काळ्या पाषाणातील महाकालीची मूर्ती सापडली आणि त्यांनी दृष्टांताप्रमाणे सर्वांना मध्यवर्ती अशा 'वाडापेठ' येथे देवीची स्थापना केली अशी दंतकथा प्रसिद्ध आहे. महाकाली देवी अनेकांना प्रसन्न होते असंही म्हटलं जातं.

कसे पोचावे - रत्नागिरी पर्यंत ट्रेन आणि त्यानंतर रिक्षा अथवा एस. टी., राजापूरपासून धारतळे आणि मग आडिवरे अशी एस. टी.



वैशिष्ट्य - अश्विन शुद्ध प्रतिपदा ते नवमी या नऊ दिवसाच्या कालावधीमध्ये महाकाली मंदिरात यात्रा भरते. या यात्रेसाठी खूपच गर्दी होते. उत्सव काळात देवीला वस्त्रालंकारांनी नटवले जाते. याच काळात दैनंदिन कार्यक्रमांबरोबर पालखी सोहळा, सांस्कृतिक-धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. हा पालखी सोहळा म्हणजे एक विहंगम दृष्यं असते.

खर्च आणि राहण्याचे दिवस - साधारण ३००० रू. आणि २ दिवस (प्रति व्यक्ती)

### तारकर्ली

कोकणात आल्यानंतर सर्वात जास्त ओढ असते ती समुद्रकिनाऱ्याची आणि आता कोकणामध्ये तारकर्लीचा समुद्रकिनारा हा खूपच प्रसिद्ध झाला आहे. कारण आता या समुद्रकिनाऱ्यावर स्कुबा डायव्हिंग आणि अन्य ॲक्टिव्हिटीही सुरू करण्यात आल्या आहेत. कोकणामधील सर्वच समुद्रकिनारे हे अतिशय स्वच्छ आहेत आणि त्यामध्ये तारकर्लीचा समुद्रकिनारा हा पुढे आहे असं म्हटलं जातं. या समुद्रकिनाऱ्यावर डॉल्फिनही आहेत आणि त्यांना बघण्यासाठीही अनेक जण कोकण सहल काढताना तारकर्लीच्या समुद्रकिनाऱ्याला मुद्दाम भेट देतात.

कसे पोचावे - मडगाव स्टेशनला उतरून रिक्षा अथवा एस. टी. अथवा स्वतःची गाडी

वैशिष्ट्य - तारकर्लीचा समुद्रकिनारा हा त्याच्या स्वच्छतेसाठी प्रसिद्ध आहे. इतकंच नाही इथलं पाणी अतिशय स्वच्छ आहे. दिवसा साधारण २० फूट खोलीपर्यंत तुम्ही डोळ्याने स्वच्छ पाणी पाहू शकता इतकी स्वच्छता या पाण्यामध्ये आहे. त्याशिवाय आजूबाजूला असणारा नयनरम्य निसर्ग हा तुमचा थकवा कुठच्या कुठे पळवून लावतो.

खर्च आणि राहण्याचे दिवस - साधारण ५००० रू. आणि ३ दिवस (प्रति व्यक्ती)

### मुरूड - जंजिरा

अलिबागमधील मुरूड - जंजिरा हे अतिशय प्रसिद्ध ठिकाण. अलिबाग हा कोकणचा एक भाग असून याठिकाणी अनेक समुद्रकिनारे आहेत. इथल्या प्रत्येक समुद्रकिनाऱ्याचे वेगळे वैशिष्ट्य आहे. या कोकणच्या भागात नेहमीच सहल काढण्यात येते. शिवाय कोकण पर्यटन स्थळे म्हणून अलिबागमधील अनेक स्थळं प्रसिद्ध आहेत. त्यापैकी मुरूड-जंजिराला तर इतिहास लाभला आहे. रायगड जिल्ह्यातील मुरुड-जंजिरा हा एक अभेद्य किल्ला आहे. आणि चारी बाजूंनी अरबी समुद्रने घेरलेला आहे. रायगड जिल्ह्याच्या पश्चिमेला अरबी समुद्र आहे. जंजिराचा अर्थ समुद्राने वेढलेला किल्ला असा होतो. भक्कम बांधकाम आणि आजूबाजूला समुद्र, याशिवाय मुरुड-जंजिराच्या तटावर ५७२ तोफा आणि त्यामुळेच हा जंजिरा अभेद्य होता. शिवाजी महाराजांच्या काळात महाराष्ट्राच्या स्वराज्यासाठी हा जंजिरा शेवटपर्यंत अजेय राहिला. आजही हा किल्ला पाहण्यासाठी अनेक पर्यटक येत असतात.

कसे पोचावे - गेट वे ऑफ इंडियावरून लाँच अलिबागपर्यंत. अलिबाग ते मुरूड जंजिरा एस. टी. अथवा रिक्षा

वैशिष्ट्य - इतिहासप्रेमी आणि किल्लाप्रेमींसाठी मुरूड - जंजिरा किल्ला ही पर्वणीच आहे. याचा इतिहास जाणून घेतल्यानंतर आपोआपच अभिमान जागृत होतो. या किल्ल्याची तटबंदी ही बुलंद आहे आणि हेच याचे वैशिष्ट्य आहे.

खर्च आणि राहण्याचे दिवस - साधारण ५००० रू. आणि २ दिवस (प्रति व्यक्ती)

### रत्नदुर्ग किल्ला

रत्नागिरीपासून साधारण दोन ते तीन किलोमीटर वर असणारा हा रत्न दुर्ग किल्ला पर्यटकांसाठी मुख्य आकर्षणाचा विषय आहे. सर्वात महत्त्वाचं म्हणजे तिथे असलेले भगवती मंदिर. समुद्रापर्यंत इथे भुयारी मार्ग जातो. इथे येणारे प्रत्येक पर्यटक हे इथल्या विहंगम दृष्यामुळे मोहून जातात. हा किल्ला समुद्राच्या काठावरील असणाऱ्या डोंगरावर बांधण्यात आला आहे. किल्ल्याच्या पाथथ्याशीच मिरकरवाडा हे बंदर आहे. हा किल्ला शिवाजी महाराजांनी आदिलशहाकडून जिंकून घेतला होता.

कसे पोचावे - रत्नागिरी स्टेशनपासून रिक्षा

वैशिष्ट्य - किल्ल्याच्या प्रवेशद्वारातून आत शिरल्यावर समोरच



भगवतीचे शिवकालीन मंदिर अतिशय सुबकरित्या बांधण्यात आले आहे. भगवती देवीचे दर्शन घेऊन पुढे गेल्यावर एका ठिकाणी चारही बाजूंनी भिंतींनी संरक्षित केलेली एक जागा आपल्याला दिसते जिथे तीन तोंडाचा भुयारी मार्ग आहे. आता हा भुयारी मार्ग वापरात नसला तरी दीपगृहाकडून किल्ल्याच्या प्रवेशद्वाराकडे लागणाऱ्या तटबंदीवरून या भुयाराचा शेवट ज्याठिकाणी होतो तेथे असलेली प्रचंड गुहा स्पष्ट दिसते.

खर्च आणि राहण्याचे दिवस - साधारण ५००० रू. आणि २ दिवस (प्रति व्यक्ती)

### श्रीवर्धन

अतिशय शांत आणि रम्य असणारा हा समुद्रकिनाराही त्याच्या स्वच्छतेसाठी प्रसिद्ध आहे. या समुद्रकिनाऱ्यावर तुम्हाला फेसाळ लाटांमध्ये फिरायला खूपच मजा येते. महाराष्ट्रातील प्रसिद्ध समुद्रकिनाऱ्यांपैकी हा एक आहे. इथून दिसणारा सूर्यास्त हा अप्रतिम असतो. अर्थात सर्वच समुद्रकिनाऱ्यांवरून सूर्यास्त चांगला दिसतो पण श्रीवर्धन किनाऱ्यावरून समुद्राच्या काठावरून पाहण्यात एक वेगळीच मजा आहे. श्रीवर्धनमधील लक्ष्मीनारायण मंदिर प्रसिद्ध आहे. शिल्पकलेचा अप्रतिम नमुना असलेली विष्णुमूर्ती आवर्जून पाहावी अशी आहे. सुमारे दोन फूट उंचीची काळ्या पाषाणाची ही मूर्ती दक्षिण भारतीय शैलीची असून शिलाहार काळातील असावी असा अंदाज आहे.

कसे पोचावे - मुंबईवरून एस. टी., बस

वैशिष्ट्य - श्रीवर्धनमधील सोमजाई मंदिर २००-२५० वर्षांपूर्वीचे आहे. अगस्ती मुनींनी याची स्थापना केली, असे मानले जाते. या मंदिराचा जीर्णोद्धार पेशव्यांनी केला. येथील कोरीव काम व जुन्या काळातील समया बघण्यासारख्या आहेत असे सांगितले जाते. कोकण पर्यटन करायचे असेल तर श्रीवर्धनला भेट दिलीच पाहिजे.

खर्च आणि राहण्याचे दिवस - साधारण ६००० रू. आणि २ दिवस (प्रति व्यक्ती)

### धुतपापेश्वर

शांत आणि डोंगराच्या मधोमध असणारं हे काळ्या पाषाणातील शिवलिंग असणारं निसर्गाच अप्रतिम ठिकाण. पेशवेकालीन बांधकाम या मंदिरात असून इथे लाकडात खूपच आकर्षक काम करण्यात आलं आहे. यावर अनेक कलाकुसरी आहेत ज्या पाहण्यासारख्या आहेत. हे मंदिर पुरातन असून सहसा पावसाळ्याच्या दिवसात येथील धबधबा बघण्यासाठी अनेक पर्यटक जातात. इथे शंकराचे असलेले मंदिर आणि आजूबाजूचा परिसर हा अतिशय नयनरम्य आणि मनोहारी आहे. तसंच महत्त्वाचं म्हणजे कोकणातील भटकंतीचा आणि दाट वनराईचा आणि वळणाच्या रस्त्यांचा आनंद तुम्हाला घ्यायचा असेल तर इथे नक्की भेट द्यायला हवी.

कसे पोचावे - रत्नागिरी स्टेशनपासून रिक्षा

वैशिष्ट्य - पताक्यांचा वापर करून तयार करण्यात आलेले शिवलिंग हे येथील वैशिष्ट्य आहे. हे शिवलिंग खूपच मोठे असून अतिशय आकर्षक आहे. महाशिवरात्रीच्या वेळी या ठिकाणी खूपच मोठा उत्सव होतो जिथे आजूबाजूच्या गावातील अनेक लोक दर्शनाला येतात.

खर्च आणि राहण्याचे दिवस - साधारण ५००० रू. आणि २ दिवस (प्रति व्यक्ती)

### थिबा राजवाडा

कोकणात फिरण्यासाठी समुद्रकिनाऱ्यांपासून ते राजवाड्यापर्यंत सर्व काही आहे. कोकणाला एक इतिहास लाभला आहे. त्यापैकीच एक स्थळ म्हणजे थिबा राजवाडा. रत्नागिरीमध्ये हा थिबा राजवाडा असून यामध्ये एक प्रादेशिक वस्तुसंग्रहालय आहे. आताचे म्यानमार अर्थात पूर्वीच्या ब्रम्हदेशाच्या थिबा मिन राजाला येथे नजरकैदेत ठेवण्यात आले होते. थिबाने वापरलेल्या अनेक गोष्टी येथे जतन करून ठेवण्यात आलेल्या आहेत. हा राजवाडा त्याकाळी ब्रिटिशांनी बांधला असून आता पर्यटनस्थळ म्हणून प्रसिद्ध आहे.


कसे पोचावे - रत्नागिरी स्टेशनपासून रिक्षा

वैशिष्ट्य - थिबा राजा आणि राणी हे दोघेही या राजवाड्यात राहात होते आणि त्यांनी वापरलेल्या अनेक गोष्टी इथे जतन करून ठेवण्यात आल्या आहेत. त्या पाहण्यासाठी कोकण सहल काढून अनेक पर्यटक इथे येत असतात. त्याशिवाय कोकणातील पर्यटन स्थळे म्हटली की थिबा राजवाड्याचं नाव आलं नाही असं होत नाही.

खर्च आणि राहण्याचे दिवस - साधारण ४००० रू. आणि २ दिवस (प्रति व्यक्ती)



# जुन्नरची गोष्ट



दंडकारण्य प्रदेश नागरी वस्तीखाली आल्यावर भौगोलिकदृष्ट्या महाराष्ट्र नावाचा प्रदेश अस्तित्वात आला. सातवाहन राजे हे महाराष्ट्राचे पहिले राजे होते. ते सुमारे 2500 वर्षांपूर्वीचे असेल. तेव्हा महाराष्ट्र समृद्धीच्या शिखरावर होता. प्रतिष्ठान [आताचे पैठण] ही सातवाहन राजांची राजधानी होती आणि जिरणानगर [आताचे जुन्नर] शहर ही उपराजधानी होती. त्यावेळी जगभरातील व्यापारी आपला माल कल्याण बंदरात उतरवत असत. नंतर नाणेघाटावरून घाटावर येऊन जुन्नरमार्गे पैठणला व्यापार करीत. तो व्यवसायासाठी कर वसूल करायचा, त्याच्या खुणा आजही जिवंत आहेत. म्हणजेच कल्याण-नाणे घाट-जुन्नर-नगर-पैठण हा महाराष्ट्राचा प्राचीन व्यापारी मार्ग होता. मग साहजिकच जुन्नर, बोरी, नगर, पैठण अशा बाजारपेठा तेव्हापासून या मार्गावर प्रसिद्ध होत्या. त्यावेळच्या राज्यांनी या व्यापारी मार्गाचे रक्षण करण्यासाठी ठिकठिकाणी किल्ले बांधले जेणेकरून व्यापाराची भरभराट व्हावी आणि आपला प्रदेश समृद्ध होत राहावा.

भैरवगड, जीवनधन, चावंड, हडसर, निमगिरी, शिवनेरी, नारायणगड, शिंदोळा, रांजणगड, कोंबड हे किल्ले जुन्नरला लुटीपासून वाचवण्यासाठी बांधले गेले आणि जुन्नरच्या डोंगराळ भागातून जाणारा व्यापारी मार्ग. जुन्नरमध्ये बहुतेक किल्ले बांधले गेले.

देश-विदेशातील व्यापाऱ्यांनी आपली संस्कृती सोबत आणली, त्यामुळे जुन्नरच्या डेक्कन कॉलेजने केलेल्या उत्खननात त्यांना 'युरो' ही ग्रीक देवता, मातीची भांडी, जुनी नाणी, सोन्याची नाणी, शिलालेख सापडले. येणाऱ्या व्यापाऱ्यांनी मुक्तपणे दान केले. त्यामुळे जुन्नर भागात प्रत्येक धमार्ची, धर्मपीठाचा विकास झाला. भौगोलिक अनुकूलता आणि त्यामुळे जुन्नर भागात लोकाश्रय सोबत राजश्रय मिळत होता. आणि म्हणून लेण्याद्री हे बौद्ध लेण्यांचे अनमोल ठिकाण म्हणून बांधले गेले, जैन देवी अंबा-अंबिकेच्या लेण्या मानमोडी डोंगरात बांधल्या गेल्या, जुन्नर शहरात प्राचीन जैन मंदिरे बांधली गेली, मध्ययुगीन काळात गिरीजाका गणपतीची स्थापना झाली. लेण्याद्रीची पूजा करण्यात आली. बौद्ध लेण्यांमध्ये, ओतूर गावासारख्या ठिकाणी वैष्णव पंथाचा रामकृष्ण हरी मंत्र संत तुकाराम महाराजांना त्यांचे गुरू चैतन्य महाराज यांनी दिला होता.


संत ज्ञानेश्वरांनी आपल्या महिषाला आळे गावात पुरले, पिंपळगाव धरणाजवळ खुबी गावात खिरेश्वर नावाचे पांडव गालिचे मंदिर बांधले गेले, खिरेश्वरच्या उत्तरेस हरिश्चंद्र गडाची अभेद्य रचना आहे. काळाच्या ओघात खूप काही बदलले, अनेक राजवटी आल्या आणि गेल्या. ज्यांनी शेकडो वर्षे वैभव अनुभवले होते, ते कधी गुलाम झाले, तर कधी दुसऱ्यांच्या दरबारात काम करू लागले. सामान्य माणूस, शेतकरी, कुणबी, बलुतेदार यांचा त्रास सुरू झाला, हे चक्र शतकानुशतके सुरू राहिले. ..आणि मग त्याच साध्या पण असामान्य स्वप्नासह योग्य वेळी एका सरदाराला मुलगा झाला. फेब्रुवारी १६२८, स्थान शिवनेरी किल्ला, शिवबा. सर रिचर्ड टेंपल यांनी शिवनेरीबद्दल एके ठिकाणी लिहिले आहे की 'शिवनेरी हे जन्म घेण्यासाठी सर्वात आदर्श ठिकाण आहे'. शिवाजी महाराज वयाच्या सहाव्या वर्षापर्यंत शिवनेरी किल्ल्यावर राहिले.

जिजामाता आणि शिवबा रोज तिथल्या शिवाई देवीच्या मंदिरात जात असत. आजही शिवनेरी किल्ल्यावर तेजस्वी शिवाई देवीची मूर्ती आहे. त्या काळातील भविष्य हा आजचा इतिहास बनला आहे आणि अनेक लोकांचे प्रेरणास्थानही आहे. उत्कटता आणि कला सुधारणे यांचा दीर्घकाळचा संबंध आहे. महात्मा ज्योतिबा फूल यांच्या 'फार्मर्स व्हिप' या पुस्तकात जुन्नर न्यायालयाच्या निर्णयाचा उल्लेख आहे, ज्येष्ठ चित्रकार सुभाष अवचट, मुक्तांगण, कवी, लेखक, विचारवंत, अनिल अवचट, मराठी बाणाचे अशोक हांडे, डॉ. शिवाजीचे पुनरुज्जीवन करणारे डॉ. अमोल कोल्हे, तमाशा लोककला देशाच्या कानाकोपऱ्यात नेणारे विठाबाई नारायणगावकर, डॉ. दत्ता महाडिक, प्रकाश खांडगे यांचेही मोलाचे योगदान आहे, मंगेश हाडवळे, ज्यांना 3 राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे, मराठी मालिकांमध्ये पदार्पण करणारी नम्रता आवटे आणि इतर अनेकजण मन्यावर जुन्नरच्या भूमीचे नाव उलगडत आहेत. जुन्नर शहरापर्यंतचा परिसर पश्चिमेला डोंगराळ आणि पूर्वेला मैदानी आहे. त्यामुळे डोंगर रांग, माळशेज घाट, नाणेघाट, दान्या घाटात त्यांची अभेद्यता दिसून येते. आंबा आणि केळी हे मूळ इंडो-बर्मा प्रदेशातील आहेत, जिथे त्यांच्या मूळ बिया आढळतात. हेच मूळ बी माळशेज घाटातही आढळते. जुन्नरमधील माणिकडोह धरणाजवळ बिबट्याचा निवारा उभारण्यात आला असून, प्राणी-पक्ष्यांवर नेहमीच दयाळूपणे वागणारे सुमारे ३६ बिबट्या सध्या तेथे उपचार घेत आहेत. समुद्रसपाटीपासून 2260 फूट उंचीवर वसलेल्या, जुन्नर पठाराला भारताचे पहिले वन रेंजर डॉ. अलेक्झांडर गिब्सन यांनी भारताचे आरोग्य केंद्र म्हटले आहे. स्वच्छ आणि मोकळ्या हवेमुळे श्वसनाचे आजार बरे होतात, असे निरीक्षण त्यांनी नोंदवले. त्यामुळे ब्रिटीश राजवटीत ते इंग्रजांना जुन्नरला जाऊन विश्रांती घेण्याचा सल्ला देत असत. १८३९ मध्ये जुन्नर येथील हिवरे गावात त्यांनी वनस्पति उद्यानाची स्थापना केली. जुन्नरच्या भौगोलिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण स्थानावर प्रकाश टाकणारी जगातील सर्वात मोठी रेडिओ टेलिस्कोप जुन्नरच्या खोडद गावात 1995 मध्ये बांधण्यात आली. यासोबतच आर्वी गावातील विक्रम सॅटेलाइट अर्थ कंट्रोल सेंटर, आणे घाटात बांधलेला नैसर्गिक पूल, बोरी गावातील कुकडी नदीपात्रात सापडलेला आठ लाख वर्षे जुना ट्रेफा, या सर्व गोष्टी जुन्नरच्या भौगोलिक महत्त्वात भर घालत आहेत. शेतीत स्वयंपूर्ण असलेल्या जुन्नर; जुन्नरमध्ये भाजीपाला, फळे, दूध उत्पादन, अगदी तांदूळ ते ज्वारी, द्राक्षे ते डाळिंब, ऊस ते हरितगृह भाजीपाला आणि फुलांची लागवड केली जाते. महाराष्ट्रात सर्वाधिक धरणे असल्याचा मान जुन्नर तालुक्याला आहे. जुन्नरमधील पिंपळगाव जोगा, माणिक डोह, येडगाव, चिलेवाडी पाचघर, वडज ही मोठी धरणे आहेत. खडबडीत आणि डोंगराळ प्रदेशामुळे जुन्नर हा आरक्षित हरित पट्टा म्हणून घोषित करण्यात आला आहे. त्याचा फायदा असा आहे की जुन्नामध्ये खुली हवा शुद्ध राहते. आणि जुन्नर हे राहण्यासाठी, प्रवासासाठी, आराम करण्यासाठी अतिशय उपयुक्त ठिकाण बनले आहे. तसेच, जुन्नरमध्ये मिळणाऱ्या मटण भाकरी आणि मसाला वडी [मसवडी] नुसत्या वर्णनाच्या नसून खऱ्या अर्थाने चवीनुसार चविष्ट असाव्यात. जुन्नरमध्ये ऐतिहासिक, भौगोलिक, नैसर्गिक, धार्मिक, कृषी, जीवनशैली, राहणीमान, खाद्यपदार्थ याबद्दल खूप काही लिहिता येते आणि प्रत्येक मुद्द्यावर एक पुस्तकही बनवता येते.

जुन्नरची पर्यटनाची शान जपण्याचे, पर्यटनातून रोजगारनिर्मिती आणि शाश्वत विकासाचे हे सर्व काम 'जुन्नर पर्यटन विकास महामंडळा'च्या माध्यमातून सुरू करण्यात आले आहे. 'शिवाजी ट्रेल' च्या माध्यमातून गडकिल्ल्यांच्या संस्कृतीच्या संवर्धन आणि संवर्धनाचे अतुलनीय कार्य जुन्नरमध्ये सुरू झाले आहे. एक जुन्नरकर म्हणून मला हा अभिमान जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवायचा आहे. जगभरातील लोकांनी जुन्नरमध्ये यावे आणि यामुळे जुन्नरमध्ये रोजगार निर्माण झाला पाहिजे. आणि हे सर्व शिस्तबद्ध वातावरणात घडावे हे माझे स्वप्न आहे. 2011 पासून आमची Hachiko पर्यटन संस्था पर्यटन क्षेत्रात काम करत आहे, एउ कल्पनेसह प्रशिक्षण देत आहे. पराशर जुन्नरच्या कृषी आणि ग्रामीण वारशाचा अनुभव देश-विदेशातील लोकांना कृषी पर्यटनाच्या माध्यमातून देत आहेत. येत्या काही वर्षांत अनेक चांगले बदल अपेक्षित आहेत. याला जुन्नरकरांच्या पाठिंब्याची आणि जुन्नरमधील निसर्गसौंदर्यप्रेमींची गरज आहे. या, या प्रयत्नात सहकार्य करा.



# कावेरी



दक्षिण भारतातील प्रमुख व पवित्र नदी. लांबी ७६० किमी. जलवाहन क्षेत्र सु.९४,४०० चौ.किमी. कर्नाटक राज्याच्या कूर्ग जिल्ह्यातील ब्रह्मगिरी डोंगरावर १,४२५ मी. उंचीवर उगम पावून ती सामान्यतः आग्नेयीकडे वाहते. परंतु तिच्या प्रवाहाची दिशा अनेक वेळा एकदम बदललेली दिसते. ती प्रथम पूर्वेस, मग काहीशी ईशान्येस, नंतर आग्नेयीस, मेत्तूर जलाशयापूर्वी कर्नाटक-तमिळनाडू सीमेवर नैर्ऋत्येस, जलाशयानंतर तमिळनाडूच्या कोईमतूर व सेलम जिल्ह्यांच्या सीमेवरुन थेट दक्षिणेस, भवानी ते श्रीरंगम् पुन्हा आग्नेयीस व त्यानंतर पूर्वेस वाहत जाते. श्रीरंगम्पासून एक फाटा कॉलेरुन नावाने ईशान्येकडे जाऊन चिदंबरम्च्या दक्षिणेकडून बंगालच्या उपसागराला मिळतो. दुसरा फाटा तंजावरवरुन जाऊन नागापट्टणम्जवळ समुद्रास मिळतो. हा फाटा कावेरीच्या सुपीक व समृद्ध त्रिभुज प्रदेशातील कालव्यांना पाणी पुरवितो. सुरुवातीच्या ब्रह्मगिरी ते कुशलनगर टप्प्यात कावेरी डोंगरातून कोरुन काढेल्या, नागमोडी, दाट वनस्पतीयुक्त व उंच उंच कडांच्या दरीतून येते. नंतर ती कर्नाटक पठाराच्या सु.३५ किमी. रुंद व १,००० मी. उंचीच्या मलनाड भागातून पुढे पठाराच्या मैदान' भागातून जाते. ती अत्यंत खडकाळ भागातून वाहते. त्यात ग्रॅनाइट खडक विशेषतः आढळतो. तिच्या मार्गात अनेक द्रुतवाह व धबधबे तयार झाले आहेत. घ्यांत चंचनकट्टी येथील प्रपात अत्यंत मनोवेधक आहे. त्यानंतर नदी सु.३००-४०० मी. रुंद होऊन तिच्यात श्रीरंगपटण हे पहिले बेट तयार झाले आहे. त्याचे आधी म्हैसूरपासून सु.१८ किमी. अंतरावर या नदीला धरण बांधून कृष्णराजसागर नावाचा जलाशय तयार केला आहे. तेथेच वृंदावर नावाचे सुरम्य विश्रामस्थान उभारलेले आहे. पुढे शिवसमुद्रम् येथेही प्रवाहाचे दोन भाग होऊन मध्ये बेट तयार झालेले आहे. पश्चिमेकडील प्रवाहाला गगनचुक्की व पूर्वेकडील प्रवाहाला भारचुक्की म्हणतात. येथे कावेरी सु.१०० मी. खोल उडी घेते. त्याचा फायदा घेऊन १९०२ पासून येथे वीजनिर्मिती केली जाते. ही वीज शेतीला, कोलार येथील सोन्याच्या खाणींना आणि बंगलोर, म्हैसूर व कोलार शहरांना पुरविली जाते. कर्नाटक राज्यात कावेरीला अनेक बांध घालून तिचे पाणी शेतीला पुरविलेले आहे. सेलम जिल्ह्यात मेत्तूर येथे कावेरीला १९३८मध्ये प्रचंड धरण बांधले असून तेथे मोठया कावेरीवरील शिवसमुद्रम्-धबधबा प्रमाणात वीज उत्पन्न केली जाते व कालव्यांनी शेतीला पाणी पुरविले जाते. नंतर एरोडवरुन श्रीरंगम् येथे आल्यावर पुन्हा नदीत बेट तयार झालेले आहे. जवळच तिरुचिरापल्ली हे प्रसिद्ध शहर आहे. येथून कावेरीला संपन्न त्रिभुजप्रदेश सुरु होतो. कर्नाटक राज्यात कावेरीला ककब्बे, सुवर्णवती, हेमावती, शिम्शा,कर्णावली, कब्बनी इ. उपनद्या मिळतात आणि तमिळनाडू राज्यात भवानी, नोयिल, अमरावती या मिळतात. कावेरी कर्नाटक व तमिळनाडू या दोन्ही राज्यांतून वाहत असल्यामुळे आणि दोन्ही राज्यांना तिच्यापासून जलविद्युत आणि शेतीसाठी भरपूर पाणीपुरवठा हवा असल्यामुळे या राज्यांत' कावेरी पाणी तंटा' उपस्थित झाला आहे. केंद्र सरकारचे धोरण पसंत नसल्यामुळे तमिळनाडू शासनाची सर्वोच्च न्यायालयाकडे धाव घेण्यापर्यंत मजल गेली आहे आणि आपले म्हणणे एकून घेतल्याखेरीज सर्वोच्च न्यायालयाने निर्णय करु नये, अशी कर्नाटक शासनाची भूमिका आहे.

### कावेरीवरील शिवसमुद्रम् धबधबा

कावेरीच्या काठचा सर्वच प्रदेश अत्यंत नयनरम्य आहे. कालवे काढून या नदीचा उपयोग शेतीसाठी करण्याची कल्पना पहिल्या शतकातील चोल राजांपासूनची आहे. अकराव्या शतकात बांधलेला ग्रॅंड ॲनिकट हा कालवा व सतराव्या शतकात चिक्कदेव राजाने बांधलेली तीन धरणे आजही चालू आहेत. तंजावरचा प्रदेश तर दक्षिण भारतातील बगीचा म्हणून प्रसिद्ध आहे. कावेरीकाठच्या प्रदेशात भात, नारळ, केळी, तंबाखू, ऊस, भुईमूग, कापूस, मिरची, तेलबिया, कॉफी, वेलदोडे, काजू, मिरी, चंदन, इमारती लाकूड, रेशीम,हिरे-माणके, मॅंगनीज लोखंड इ. अनेकविध उत्पन्ने होतात. कावेरीला दक्षिण गंगाच म्हणतात. कावेरीच्या काठची श्रीरंगपट्टण,श्रीरंगम्, कुंभकोणम्, तंजावर, तिरुवैय्यर, कावेरीपटनम् इ. तीर्थक्षेत्रे शेकडो वर्षे प्रसिद्ध आहेत. समृद्ध शेती, सुंदर नगरे, उंच उंच गोपुरे,प्रत्येक देवळाजवळचे बांधीव, रम्य तलाव यांनी कावेरीचा परिसर गजबजलेला आहे. कावेरीच्या उगमाजवळ दरवर्षी श्रावण महिन्यात मोठी यात्रा भरते. गंग, होयसळ, चोल इ. राजे व टिपू सुलतान वगैरेंच्या काळातील ऐतिहासिक आणि पुराणवस्तुविषयक अवशेषही कावेरीकाठच्या भागात आढळतात. ब्रह्मगिरीवर अपत्यप्राप्तीसाठी तप करणाऱ्या कवेर मुनीला ब्रह्मदेवाने आपल्याला विष्णूकडून मिळालेली लोपामुद्रा ही कन्या दिली.

# गोरेगावातील नामांकित शाळेत भयंकर प्रकार, 43 वर्षीय महिला मदतनीस अटकेत




**■मुंबई। प्रतिनिधी :**

गोरेगाव येथील एका नामांकित शाळेत शिकणाऱ्या चार वर्षांच्या मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. गोरेगाव पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करीत तपास केला असता, शाळेतील महिला मदतनीसाला (केअर टेकर) यात सहभाग असल्याचे उघड झाले. तिच्यासह आणखी तिघींना पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे.

अटकेतील महिलेची रवानगी न्यायालयाने तुरुंगात केली आहे. मुंबईतील गोरेगाव भागातील शाळेत शिकणाऱ्या मुलीला घेण्यासाठी सोमवारी तिची आजी गेली. घरी आल्यानंतर मुलीचे कपडे बदलत असताना ती अस्वस्थ असल्याचे आजीच्या लक्षात आले. याबाबत विचारल्यानंतर मुलीने वेदना होत असल्याचे आजीला सांगितले. हा प्रकार कुटुंबीयांना कळताच त्यांनी शाळा प्रशासनाशी संपर्क साधला. त्यानंतर मुलीला खासगी रुग्णालयात नेण्यात आले. तपासणीदरम्यान तिच्या अंगावर जखमेच्या खुणा आढळल्या. हे पाहून तिच्या पालकांनी गोरेगाव पोलिस ठाण्यात तक्रार केली.

या प्रकाराची गंभीर दखल घेत गोरेगाव पोलिसांनी बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण (पोक्सो) कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला. बुधवारी पोलिसांनी तपास करून शाळेत काम करणाऱ्या 43 वर्षीय मदतनीस महिलेला अटक केली. अटक केलेल्या महिला कर्मचाऱ्याची नेमकी भूमिका स्पष्ट झालेली नाही. याशिवाय, शाळेतील आणखी तीन महिला सहायक कर्मचाऱ्यांचीही चौकशी केली जात आहे.

'त्या' मुलाला जन्मठेप

दुसरीकडे, दारूच्या नशेत आईला बेदम मारहाण करून तिच्यावर अत्याचार करणाऱ्या मुलाला गुरुवारी न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा ठोठावली आहे. यवतमाळ जिल्ह्यात वणी तालुक्यातील एका गावात 23 जुलै 2021 रोजी रात्री ही घटना घडली होती. आरोपीची आई मुलीला भेटण्यास वणी तालुक्यातील एका गावात गेली होती. बहिणीशी भावाचे पटत नसल्याने संतप्त झालेल्या मुलाने आईला पट्ट्याने दोन दिवस मारहाण केली. घटनेच्या दिवशी दारूच्या नशेत आलेल्या मुलाने आईला जेवण मागितले. तिला पट्ट्याने पुन्हा मारहाण केली. यावरच त्याचे समाधान झाले नाही. त्याने आईवरच अत्याचार केला. इतकेच नव्हे तर त्याचा मोबाइलवर व्हिडीओ तयार केला.

# वर्चस्वाच्या लढाईतूनच नाशिकमध्ये 'तो' गोळीबार, 11 जणांना बेड्या



**■मुंबई। प्रतिनिधी:**

नाशिकच्या पंचवटीतील राहुलवाडी परिसरात बुधवारी पहाटे घडलेल्या गोळीबाराच्या घटनेमुळे शहरात मोठा खळबळ उडाली आहे. जुना वाद आणि वर्चस्वाची झुंज या पार्श्वभूमीवर सागर जाधव या युवकावर थेट गोळ्या झाडण्यात आल्या. या प्रकरणात तब्बल 11 संशयित आरोपींना नाशिक पोलिसांनी अटक केली असून दोन आरोपी अद्याप फरार आहेत.

राहुलवाडी, फुलेनगरजवळ राहणाऱ्या सागर विठ्ठल जाधव या युवकावर बुधवारी पहाटे गोळीबार करण्यात आला. यामध्ये एक गोळी डाव्या गालातून घुसून मानेत अडकली, ज्यामुळे तो गंभीर जखमी झाला. सागर जाधव याच्यावर सध्या खासगी रुग्णालयात उपचार सुरू असून त्याची प्रकृती चिंताजनक आहे.

या प्रकरणी योगेश माधव वाघमारे (28, रा. समाजमंदिराशेजारी, राहुलवाडी) यांनी पंचवटी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. फियार्दीनुसार, आरोपी विकी विनोद वाघ व विकी उत्तम वाघ हे दोघे घटनास्थळी आले आणि विकी वाघ याने कमरेतील पिस्तुलमधून सागरवर गोळीबार केला.

पोलिस तपासात समोर आले की, हा हल्ला टोळीयुद्ध व जुन्या वादातून घडला आहे. गोळीबाराच्या घटनेनंतर नाशिक पोलिसांनी पंचवटी, भद्रकाली आणि गुंडाविरोधी पथकांची विशेष मोहीम राबवून, फुलेनगर परिसरातून 11 संशयित आरोपींना अटक केली आहे. हे सर्व आरोपी गंभीर गुन्ह्यांमध्ये सामील असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

फरार आरोपींचा शोध सुरू

गोळीबारात वापरलेली पिस्तुल आणि इतर कटात सामील असलेल्या व्यक्तींचा शोध पोलिसांकडून सुरू आहे. यातील दोन आरोपी अजूनही फरार असून, त्यांच्यासाठी विशेष शोधपथक रवाना करण्यात आले आहेत. पंचवटी पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून, सर्व अटकेतील आरोपींना लवकरच न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

# 71 वर्षांची ती लग्न करण्यासाठी अमेरिकेहून भारतात आली, बेपत्ता झाली अनेक महिन्यांनी उलगडलं गुपित..

**■मुंबई। प्रतिनिधी:**

वय वाढत गेल्यावर माणसाला आधाराची गरज भासते. तरूणपणी लग्न करणं टाळणाऱ्यांनाही आयुष्याच्या उतारवयात कोणाचीतरी सोबत हवी असते. भारतीय वंशाच्या पण अमेरिकेत राहणाऱ्या एका 71 वर्षांच्या महिलेला अशीच सोबतीची गरज भासू लागली आणि ती 75 वर्षांच्या आजोबांच्या प्रेमात पडली. त्यांच्याशी लग्न करण्यासाठी ती अमेरिकेहून भारतात देखील आली. पण... त्यापुढे तिचा काही पत्ताच लागेना. 24 जुलैला भारतात, पंजाबला गेलेल्या बहिणीचा फोन सतत स्विच ऑफ लागल्यावर तिच्या अमेरिकेतील बहिणीने भारतातील अमेरिकन दुतावासातील अधिकाऱ्यांना कळवलं. त्यांनी पंजाबमधील अधिकाऱ्यांना फोन करून तपास करायला सांगितलं, पण त्यानंतर जे सत्य समोर आलं त्याने महिलेची बहीणच नव्हे तर सगळेच अधिकारी घाबरले. पंजाबमधील लुधियाना जिल्ह्यातील किला रायपूर गावात अमेरिकेहून आलेल्या रुपिंदर कौर या 71 वर्षांच्या महिलेची बेसबॉल बॅटने मारहाण करून हत्या करण्यात आली. एवढंच नव्हे तर हत्येनंतर, मारेकऱ्याने मोठ्या प्रमाणात कोळसा मागवला आणि घराच्या आत आग लावून रुपिंदरचा मृतदेह जाळण्याचा प्रयत्न केला. दोन-तीन दिवसांत मृतदेह राख आणि हाडे उरल्यानंतर, त्याने ते पोत्यांमध्ये भरले आणि नाल्यात फेकून दिले. घटनास्थळावरून पोलिसांनी काही हाडे, हातोडा आणि इतर वस्तू जप्त केल्या आहेत. काही दिवसांपूर्वीच हा गुन्हा उघड झाला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या




हत्येमागे युकेमधील 75 वर्षीय चरणजित सिंग आणि लुधियाना जिल्हा न्यायालयात टायपिस्ट असलेला सुखजित सिंग उर्फ सोनू यांचा हात आहे. 75 वर्षांचा चरणजित सिंग इंग्लंडमध्ये राहतो आणि त्याने पूर्वी रुपिंदरशी लग्न करण्याचे मान्य केले होते. मात्र काही दिवसांनी त्याने या नात्यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला. पण रुपिंदर ही लग्नासाठी अडूनच बसली होती, त्याच्यावर दबावा आणू लागली. तक्रार करून पोलिसांचं लचांड मागे लावे अशी धमकीही तिने दिली. अखेर त्याने तिला मारण्याचा कट रचला. चरणजीतने भारतात राहणाऱ्या सुखजीतला 50 लाख रुपये देण्याचे आणि युकेला बोलावण्याचे आमिष दाखवत रुपिंदरच्या हत्येसाठी तयार केलं.

रुपिंदर या जुलैमध्ये भारतात आल्या, पण 24 तारखेपासून त्यांचा फोन लागत नव्हता, अखेर काही दिवसांनी त्यांच्या बहिणीने भारतातील अमेरिकन दूतावासाला ही माहिती देत मदत मागितली. त्याच वेळी अशी माहिती देखील समोर आली की (आरोपी) सुखजीतने 19 ऑगस्ट रोजी पोलिसात तक्रार दाखल केली की रुपिंदर बेपत्ता आहे.

# सोन्याच्या लालसेपोटी कट, 76 वर्षीय वृद्धाला सलून मालकाने संपवलं अन् मृतदेह ड्रेनेजमध्ये फेकला

**■मुंबई। प्रतिनिधी :**

मिरा-भाईंदर परिसरात एक अत्यंत धक्कादायक आणि हृदयद्रावक घटना उघडकीस आली आहे. सोन्याच्या लालसेपोटी एका 76 वर्षीय वृद्धाची निर्घृण हत्या करण्यात आली असून, या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, विठ्ठल तांबे (वय 76) हे 16 सप्टेंबर रोजी अचानक बेपत्ता झाले. नेहमीप्रमाणे घराबाहेर गेलेले तांबे काही वेळात परत आले नाहीत आणि त्यांच्याशी संपर्कही साधता न आल्याने त्यांच्या कुटुंबियांकडून चिंतेने काशिमिरा पोलीस ठाण्यात त्यांच्या बेपत्ता होण्याची तक्रार दाखल करण्यात आली. 17 व 18 सप्टेंबर रोजी पोलिसांनी तांबे कुटुंबियांसह परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासायला सुरुवात केली. तपासादरम्यान विठ्ठल तांबे हे शेवटचे एका स्थानिक सलूनमध्ये जाताना दिसून आले. यानंतर पोलिसांनी सदर सलूनचे सीसीटीव्ही फुटेज मिळवून तपासले असता एक धक्कादायक बाब समोर आली. फुटेजमध्ये सलून मालकानेच विठ्ठल तांबे यांची गळा आवळून हत्या केल्याचे दिसून आले. त्यानंतर त्याने त्यांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने चोरले. इतकेच नव्हे तर, आरोपीने मृतदेह सलूनच्या आतील भागातून ओढत नेतानाचा व्हिडिओही फुटेजमध्ये दिसून आला आहे.

मृतदेहाची विल्हेवाट

तपास अधिक खोलात गेल्यावर उघड झाले की आरोपीने हत्या केल्यानंतर मृतदेह सलूनमधून बाहेर ओढून नेला आणि तो जवळच्या ड्रेनेजमध्ये फेकून दिला होता, जेणेकरून त्याचा कोणताही ठावठिकाणा लागू नये. या गंभीर गुन्ह्याची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने कारवाई करत सलून चालकाला अटक केली आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून, आरोपीने यापूर्वीही अशा प्रकारचे गुन्हे केले आहेत का, याचीही चौकशी केली जात आहे.

# 25 वर्षीय दुसऱ्या पत्नीची हत्या, 39 वर्षीय दीपक राऊतचा पाय खोलात

**■भुवनेश्वर। प्रतिनिधी :**

ओदिशात वाहतूक पोलीस कॉन्स्टेबल असलेली 25 वर्षीय पत्नी शुभमित्रा साहू हिची हत्या केल्याचा आरोप असलेला 39 वर्षीय कॉन्स्टेबल दीपक कुमार राऊत याच्या अडचणीत वाढ झाली आहे. दीपकच्या पहिली पत्नी अपर्णा प्रियदर्शिनी हिच्या कुटुंबियांनीही आता पोलिसात तक्रार दाखल केली आहे. 2019 मध्ये अपर्णा यांचा रस्ते अपघातात मृत्यू झाला होता. मात्र, आता त्यांच्या कुटुंबीयांना घातपाताचा संशय आहे.

अपर्णा प्रियदर्शिनी हिच्या कुटुंबीयांनी आरोप केला आहे की, दीपक राऊत याने अपर्णा यांना त्रास दिला. अपर्णाचा




मृत्यू हा अपघात नसून घातपात असल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला आहे. अपर्णाच्या मृत्यूची पुन्हा चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अपर्णा आणि शुभमित्रा या दोघींना प्रत्येकी एक कोटी रुपयांचे विमा संरक्षण होते. अपर्णाच्या मृत्यूनंतर दीपकला एक कोटी रुपयांची विमा रक्कम मिळाली होती.

अपर्णा मूळ ओदिशातील धेनकनाल जिल्ह्यातील होत्या. मॅट्रिमोनियल साईटद्वारे ओळख झाल्यानंतर त्यांनी 25 एप्रिल 2018 रोजी दीपकशी लग्न केलं. त्यावेळी अपर्णा 31 वर्षांच्या होत्या. त्या धेनकनाल जिल्ह्यातील पर्जनग तहसीलमध्ये Revenue Inspector (महसूल निरीक्षक) म्हणून कार्यरत होत्या.

17 मार्च 2022 रोजी दीपक राऊतने सांगितलं की, कटक जिल्ह्यातील खुंटुनीजवळ ट्रकने धडक दिल्याने अपर्णा यांचा मृत्यू झाला. ते दोघे भुवनेश्वरला परतत असताना ही घटना घडली. दीपकने सांगितलं होतं की आमच्या गाडीचे टायर पंक्चर झाले होते. मी टायर बदलत असताना अपर्णा रस्ता ओलांडत होती. यावेळी ट्रकने तिला धडक दिली.₹

अपणार्ची धाकटी बहीण रोझलिन राऊतने सांगितलं की, सुरुवातीला, आम्हाला तो अपघात वाटला. आता दीपकची दुसरी बायको शुभमित्रा साहू यांच्या हत्येनंतर, माज्या बहिणीचीही दीपकनेच हत्या केली असावी, असा आम्हाला संशय आहे. मी माज्या बहिणीच्या मृत्यूची पुन्हा चौकशी करण्याची मागणी करत धेनकनाल पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली आहे.₹

रोझलिनने पुढे आरोप केला की, अपणार्चे दीपकसोबतचे वैवाहिक जीवन अडचणींनी भरलेले होते. लग्नाच्या काही महिन्यांतच दीपक माज्या बहिणीला त्रास देऊ लागला. अपणार्ने पोलिस आयुक्तालयात ऑनलाइन तक्रारही दाखल केली होती, पण कोणतीही कारवाई झाली नाही.

# आणखी एका वैष्णवीचा बळी...माझ्यामुळे माझे आई वडील टेन्शनमध्ये , चिठ्ठी लिहीत गर्भवती महिलेने उचललं टोकाचं पाऊल




**■मुंबई। प्रतिनिधी :**

हुंड्यासाठी होणाऱ्या छळामुळे पुण्याजवळच्या गावात राहणाऱ्या वैष्णवी गहवणे या विवाहीत महिलेने आत्महत्या केल्याच्या घटनेने प्रचंड खळबळ माजली होती. सासू, सासरे, नणंद आणि त्यांना साथ देणारा पती, यांच्या छळाला कंटाळून वैष्णवीने काही महिन्यांपूर्वी आयुष्य संपवलं. यामुळे राज्यातलं वातावरण खूप तापलं होतं, हे प्रकरण खूप गाजलं. त्याचे पडसाद अद्यापही उमटत असतानाच आता अशाच एका घटनेने जळगावही हादरलं आहे. सासरच्या छळाला कंटाळून 5 महिन्यांची गरोदर असलेल्या विवाहीत महिलेने गळफास लावून घेत आयुष्य संपवल्याचे उघड झाले आहे. वैष्णवीप्रमाणेच आणखी एकीचा बळी गेल्याने जळगवाकर हळहळत आहेत. एमआयडीसी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पोलीस पुढील तपास सुरू आहे.

माज्यामुळे माझे आई वडील टेन्शनमध्ये आले

मिळालेल्या माहितीनुसार, जळगाव तालुक्यातील शिरसोली येथे गरोदर विवाहितेने गळफास घेऊन आयुष्य संपवलं. प्रज्ञा चेतन शेळके असे मयत विवाहितेचे नाव असून ती अवघ्या 22 वर्षांची होती. धक्कदायक गोष्ट म्हणजे पोटात बाळ असतानाही तिने जीव देण्याचा निर्णय घेतला म्हणजे तिचा किती छळ झाला असेल असा प्रश्न नागरिकांच्या मनात आहे. गरोदर असलेल्या प्रज्ञाने मृत्यूपूर्वी सुसाईड नोट लिहून ठेवली होती. पतीसह सासरच्या लोकांच्या त्रासाला, त्यांच्या छळाला कंटाळून मी आत्महत्या करत असल्याचा आरोप तिने या नोटमध्ये केला आहे. पाच महिन्यानंतर गर्भपात करण्यासाठी सासरच्यांचा दबाव होता.तसेच सासू सासरे यांनी केलेल्या छळामुळे मानसिक तणावात असल्याने आत्महत्या करत असल्याचे विवाहितेने मृत्यू पूर्वी लिहिलेल्या चिठ्ठी मध्ये नमूद केले होते. एवढंच नव्हे तर गर्भपात करण्यास नकार दिल्याने, पतीसह सासरच्या मंडळींनी मारहाण केल्याचा आरोपही तिने चिठ्ठीमध्ये केला आहे. माज्यामुळे माझे आई वडील टेन्शनमध्ये आले, या मानसिक तणावात आत्महत्या करत दारूण सत्यही तिने चिठ्ठीमधून मांडलंय.

# 500 रुपये भरुन बँकेत खातं उघडलं, एक ट्रिक वापरुन 5 कोटी काढले, 23 वर्षीय तरुण पोलिसांच्या रडारवर

**■लखनौ। प्रतिनिधी :**

उत्तर प्रदेशातील हाथरस येथील आकाश नावाच्या 23 वर्षीय तरुणाने सुरुवातीला फक्त पाचशे रुपये जमा केलेल्या बँक खात्यातून तब्बल पाच कोटी रुपये फसवणुकीने काढल्याचा आरोप झाल्यानंतर खळबळ उडाली आहे. ₹माँ चामुंडा स्वीट अँड नमकीन₹ नावाचं छोटंसं दुकान चालवणाऱ्याने आकाशने वडिलांच्या मृत्यूनंतर त्याच्या घराची जबाबदारी घेतली होती. मात्र झटपट श्रीमंत होण्याच्या नादात तो चुकीच्या मार्गाला लागल्याचे चित्र आहे. बेतास बात कमाई करुन जगणाऱ्या आकाशने अचानक मोठ्या प्रमाणात पैसे खर्च करायला सुरुवात केल्यावर परिसरातील लोकांना संशय आला. त्याने आधी अडीच लाख रुपयांची यामाहा आर15 बाईक खरेदी केली, नंतर थार एसयूव्ही बुक केली, इतकंच नाही, तर सुमारे साडेतीन लाख रुपयांचे सोने खरेदी केले. यावरुन त्याच्या शेजाऱ्यांना संशय आला. एक साधा नाश्ता विक्रेता असलेल्या आकाशच्या संपत्तीत अचानक वाढ झाल्याचा त्यांना विश्वासच बसत नव्हता, त्यामुळे शेजाऱ्यांनी अधिकाऱ्यांना याची माहिती दिली. टिप मिळाल्यानंतर हाथरस पोलिसांनी या प्रकरणाचा तपास करण्यासाठी एक विशेष ऑपरेशन ग्रुप स्थापन केला. पथकाने आकाशच्या बँक व्यवहारांची, विशेषतः बँक ऑफ इंडियामधील त्याच्या खात्याशी संबंधित व्यवहारांची, त्वरित चौकशी सुरू केली. तपासादरम्यान पोलिसांच्या हाती धक्कादायक माहिती लागली आणि त्यांनी आकाशला चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले. त्याचे संपूर्ण विधान अद्याप सार्वजनिक झालेले नाही. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आकाशने मे 2025 मध्ये एचडीएफसी




बँकेत 500 रुपयांसह खातं उघडलं. नंतर त्याने 5000 रुपयांचा ओव्हरड्राफ्ट घेतला. कालांतराने, त्याने लहान ठेवी करुन त्याची ओव्हरड्राफ्ट मयार्दा वाढवली. अखेर तो अशा टप्प्यावर पोहोचला की त्याने 50 लाख रुपये परत जमा न करता काढले. अशा एकूण नऊ व्यवहारांद्वारे बँकेच्या ओव्हरड्राफ्ट प्रणालीचा वापर करुन 5 कोटी रुपये काढण्यात तो यशस्वी झाला. पोलिसांनी सांगितले की आकाशने ऑनलाइन ट्रेडिंग ॲप्स वापरून काढलेल्या पैशांपैकी सुमारे 3.5 कोटी रुपये शेअर बाजारात गुंतवले.

# 'म्हाडासाथी' एआय चॅटबॉटचे लोकार्पण, म्हाडाचे आणखी एक तंत्रस्नेही पाऊल

**■मुंबई। प्रतिनिधी :**

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) एक लोकाभिमुख संस्था असून नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक आणि कार्यक्षम सेवा मिळाव्यात या उद्देशाने म्हाडाने आतापर्यंत नागरिक सुविधा केंद्र (सीएफसी), अभ्यागत व्यवस्थापन प्रणाली (व्हीएमएस), आणि डीजी-प्रवेश यांसारख्या महत्त्वपूर्ण डिजिटल सेवा सुरू केल्या आहेत. या शृंखलेत आणखी एक अभिनव पाऊल यकत, आज 'म्हाडासाथी' या एआय चॅटवॉट सेवेचे लोकार्पण 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांच्या हस्ते गुरुवारी संपन्न झाले.

म्हाडा मुख्यालयातील गुलजारीलाल नंदा सभागृहात आयोजित कार्यक्रमात 'म्हाडासाथी' एआय चॅटवॉटचे प्रात्यक्षिक देताना जयस्वाल म्हणाले की, डीजीटायझेशनच्या युगात म्हाडाने आपल्या कार्यपद्धतीत सातत्याने सुधारणा करत नागरिकांसाठी उपयुक्त व तंत्रज्ञानाधारित सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. 'म्हाडासाथी' हा चंटबॉट त्या दिशेने घेतलेले आणखी एक महत्त्वाचे पाऊल आहे. ते पुढे म्हणाले की, पहिल्या टप्प्यात हा चॅटबॉट म्हाडाच्या संकेतस्थळावर कार्यान्वित करण्यात आला असून, याद्वारे नागरिकांना विविध विषयांवरील अचूक, विश्वासार्ह व तत्काळ माहिती मिळणार आहे. दुसऱ्या टप्प्यात, ही सेवा लवकरच मोबाईल प्लॅटफॉर्मवर देखील




उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे जयस्वाल म्हणाले.

'म्हाडासाथी' हा एनेन्टिक चॅटबॉट मराठी व इंग्रजी अशा दोन्ही भाषांमध्ये उपलब्ध आहे. म्हाडाच्या सर्व नऊ विभागीय मंडळांशी संबंधित संकेतस्थळावर उपलब्ध असलेली माहिती या चेटबॉटमध्ये नागरिकांना सहज मिळणार आहे. या उपक्रमामुळे म्हाडाच्या कार्यप्रणालीविषयी माहिती संगणकीय सोडत प्रणाली विषयीची माहिती, नागरिकांनी म्हाडा कार्यालयामध्ये केलेल्या अर्जाच्या सद्यस्थितीबाबतची माहिती, म्हाडातर्फे प्रसिद्ध होणारी निविदा सुचनांबाबतची माहिती, म्हाडाच्या राज्यातील विविध गृहप्रकल्पांची माहिती, म्हाडाचे नवीन नियम, नियमावली यांबाबतची अद्ययावत माहिती नागरिकांना या माध्यमातून मिळणार आहे.या कार्यक्रमास मुंबई इमारत सुधार व पुनर्विकास मंडळाचे मुख्य अधिकारी मिलिंद शंभरकर (भा.प्र.से.), मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी मिलिंद बोरीकर (भा. प्र.से.), म्हाडाचे मुख्य अभियंता धीरजकुमार पदरकरी, महेशकुमार जेसवाणी, ननावरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनिल वानखडे, कोकण मंडळाच्या मुख्य अधिकारी रेवती गायकर यांच्यासह अन्य अधिकारी आणि कमचार्री वर्ग उपस्थित होते.नागरिकांना घरातूनच डॉक्यूमेंट पाठवता येणार

म्हाडातर्फे नागरिक सुविधा केंद्राला भेट देणाऱ्या नागरिकाचा प्रतीक्षा कालावधी कमी करण्यात आला असून तो कमी होऊन आता ७ ते ८ मिनिटांवर आणला आहे. नागरिकांचे दस्तवेज अथवा टपाल स्कॅनिंगसाठी लागणारा वेळ टाळण्यासाठी नागरिक आपली कागदपत्रे स्कॅन करून यापुढे या केंद्रावर सादर करू शकतील, तसेच पुढच्या टप्प्यात या सुविधा केंद्रावर येऊन कागदपत्रे सादर करण्यापेक्षा नागरिकांना घरी बसूनच कागदपत्रे पाठवता येतील याहृष्टीने ही प्रणाली अद्ययावत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, अशी माहिती देखील जयस्वाल यांनी दिली. तसेच म्हाडाने आपल्या वेबसाईटवर सुमारे १५ कोटी कागदपत्रे उपलब्ध करून दिल्यामुळे म्हाडामध्ये माहिती अधिकारांतर्गत येणारे अर्ज तुलनात्मकरित्या कमी झाले असल्याचे निर्दशनास आले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com